# प्रकरण ४ थे

# ‘कोकरउड्या’ व ‘रानपालखी’ या आत्मकथनातील व्यक्तिरेखा

## प्रकरण ४ थे

# अ) 'कोकरउड्या' आत्मकथनातील व्यक्तिरेखा

### ४.१ प्रास्ताविक :

प्रा. व. बा. बोधे यांचे 'कोकरउड्या' हे आत्मकथन मार्च १९९३ ला प्रकाशित झाले. या आत्मकथनात त्यांच्या जन्मापासून ते नीरा गावाजवळील सोमेश्वरच्या मु. सा. काकडे या महाविद्यालयात प्राध्यापकाची नोकरी लागेपर्यंतचा सर्व जीवनपट त्यांनी मांडला आहे. आपण कोणत्या प्रकारचे जीवन जगलो, शिक्षण घेताना कोणकोणत्या प्रसंगांना सामोरे जावे लागले. त्यातून कसे मार्ग काढले याचे वास्तव चित्रण प्रा. व. बा. बोधे यांनी आत्मकथनातून मांडले आहे.

'कोकरउड्या' या आत्मकथनात अनेक व्यक्तिरेखा आलेल्या आहेत. त्या पात्रांचा आणि लेखक वसंत बोधे यांचा संबंध आलेला आहे. व. बा. बोधे यांच्या सर्वांग व्यक्तिमत्त्वाचा शोध घेण्यासाठी 'कोकरउड्या'तील व्यक्तिरेखांचा परिचय करून घेणे महत्त्वाचे आहे.

### ४.२ कोकरउड्यातील प्रमुख व्यक्तिरेखा :

### १) 'वसंत' आत्मकथनाचा नायक :

वसंत बोधे हे 'कोकरउड्या' या आत्मकथनातील प्रमुख पात्र आहे. त्यांच्याभोवतीच सर्व घटना घडत आहेत. 'कोकरउड्या' या आत्मकथनात वसंताच्या जन्मापासूनचे प्रसंग येतात. ''इठ्ठलवाडीच्या मावळणीला घोलात फुललेल्या म्हैदांच्या मळ्यात पाचसा खणांच्या झोपड्यात नवऱ्याकडून हाकलल्याली हौसाक्का दिस भरल्याली कण्हत हुती... तिला झालेलं दुसरं मूल गोरपान भोपळ्यावानी गोल गरगरीत आयाबापापरास उजवं ... तोच मी ग्रामीण कादंबरीकार आणि मराठीचा एक अभ्यासू प्राध्यापक म्हणून महाराष्ट्राचा काही भाग मला ओळखतो.'' (कोकरड्या, पृ.९) अशी स्वत:ची ओळख व. बा. बोधे आत्मकथनात करून देतात.

वसंताचा जन्म अत्यंत गरीब कुटुंबात मामाच्या गावी झाला. बालपण मामाच्या गावी गेले. खालच्या मामाच्या घरापेक्षा वरच्या महादेव मामाचे घर वसंताला जास्त आवडत असते. कारण ते घर मोठे होते. त्या घराच्या जवळच पाण्याची विहीर, आजूबाजूला झाडांची गर्दी होती. यावरून वसंताला निसर्गाविषयी प्रेम होते हे दिसून येते. त्याचप्रमाणे खेळण्यासाठी मुलं-मुलीसुद्धा भरपूर होती. खेळण्याच्या नादात त्याला जेवणाचे सुद्धा भान राहत नव्हते. इतका वसंता खेळण्यात मग्न असायचा. लहानपणा-पासूनच वसंताच्या मनात निसर्गाविषयी आकर्षण निर्माण झाले होते. कमला मामीसोबत गुरे राखणे,

विहिरीवरती मोटार चालू झाली की गार पाण्यात अंघोळ करणे, आंबा, बोरे, जांभूळ खात दिवसभर खेळणे असे वसंताचे छंद होते.

गोपाळ मामाने मळ्यातून येताना मोर पकडून आणला. त्यावेळी त्या मोराकडे एकटक बघत होता. यातून त्याचे मोराचे आकर्षण दिसून येते. मळ्यात पारव्यांची शिकार करण्यासाठी शिकारी येत. त्यावेळी वसंत मळ्यातील झाडीतून भटकताना शिकारी गोळी झाडतो. ती त्याच्या पाठीमागून जाते. त्यावेळी शिकाऱ्याला घाम फुटला होता. अशा या कठीण प्रसंगातून त्यांचा जीव वाचला होता. बालपणी आई सोडली तर वसंताला कोणीसुद्धा जवळ घेत नव्हते. कारण वसंताचे दात सदैव अस्वच्छ, पिवळे, कपडे फाटलेले, गाल फुगलेले होते. प्रत्येकजण चिडवत असे. कोणीही वसंतावर वर्चस्व गाजवत असे. यावरून वसंताचा स्वभाव गरीब असल्याचे दिसून येते. घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत दयनीय व हलाकीची होती. त्यामुळे दोनवेळचे अन्नसुद्धा वसंताला मिळत नव्हते. तरी सुद्धा वसंता येईल त्या अडचणींना तोंड देऊन जगत होता. दु:खाला सामोरे जाण्याची ताकद वसंतात होती.

वसंताचे मन एकत्र कुटुंबात रमले नाही. लहानपणापासून वसंत काहीना काही खटपटी करत होता. ओढ्याला खेकडे, मासे पकडणे, बटाटे उकरणे, शेंगा तोडणे असे उद्योग करण्यात वसंताला रस वाटत असे. तसेच लहानपणापासून पुस्तके वाचण्याचा त्याला छंद होता. 'गड आला पण सिंह गेला' या नाटकातील संवाद तोंडपाठ होते. शाळेत असताना वसंताच्या मनावर चांगले संस्कार शिक्षकांनी केले. त्यामुळे त्याला गुरुंविषयी आदर वाटे.

वसंताच्या घरची आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामुळे वसंताला हलाकीत दिवस काढावे लागले. त्यातच चप्पल, छत्री विसरणे यामुळे खर्चात भर पडे. आईचा मार खावा लागतो. पण तो कधीच आईवर रागावत नसे. त्याला आईविषयी प्रेम होते.

एकदा वसंताच्या घरी भाकरीला पीठ नव्हते. त्यामुळे वसंता त्याच्या मित्राच्या सहाय्याने गावातून 'धोंडी' काढतो व तो प्रसंग निभाऊन नेतो. स्वत: थोडी भाकरी खाते. त्यातील कोर आईला आणतो. यातून त्याचा आईवरचा जिव्हाळा दिसतो. कितीही कठीण प्रसंगाला तोंड देण्याचे कौशल्य वसंताजवळ होते हे दिसून येते.

वसंताला अभ्यासाविषयी आनंद नव्हता. मात्र वाचनाची मनापासून आवड होती. वसंता लहानपणीच 'तुरुंगांची यात्रा', 'मराठ्याची मुलगी', 'चंदग्रह ऊर्फ नेकजात', 'धर्मवीर संभाजी', 'चंद्रराव मोरे', 'झुंजारराव' अशी ऐतिहासिक नाटके वाचली होती. स्वत: मासिक विकत घेण्यासाठी

पैसे नव्हते. म्हणून विलास माने यांच्याकडून चांदोबा मासिक घेऊन वाचणे, प्रसंगी शाळेतील गुरुजींच्या पेटीचे कुलूप फोडून 'करुणादेवी', 'श्यामची आई', 'ईश्वरचंद्र' विद्यासागराचे चरित्र ही पुस्तके वाचली. अशा प्रसंगातून वसंताचे साहित्यावरचे प्रेम व साहित्याची आवड दिसून येते.

वसंताला वडिलांचे प्रेम फार कमी मिळाले. बाबासाहेबांचा स्वभाव छंदीफंदी असल्याने मुलांकडे किंवा परिवाराकडे त्यांचे लक्ष नव्हते. मटक्याच्या जुगाराच्या नादात रद्‌दी जाळावी त्याप्रमाणे त्यांनी जुगार, मटका यामध्ये भरपूर पैसा खर्च केला. अपुऱ्या ज्ञानामुळे वसंतावरती अनेक प्रसंग येत. सहलीला सिंहगडावर गेला त्यावेळी बिबटयाने त्यांचे तोंड सुजले होते. तरी सुद्धा त्याने ते सहन केले. वसंता पुसेगावच्या यात्रेला गेला त्यावेळी पोळपाट लाटणे आणतो. यातून त्याचे आईविषयी व संसाराविषयीची आपुलकी दिसून येते. मोठ्या मुलांच्या सांगण्यावरून लमाणी समाजाच्या मुलीला 'यमाना देंगा' म्हटल्यामुळे मुलीचा मार खावा लागतो. अशा त्याच्या अज्ञानी बुद्धीने त्याच्यावर अनेक प्रसंग ओढवतात.

वसंता एकदा आईला चहा मागतो. पण घरात दूध नव्हते. आई जेवायला वाढते. पण वसंता हट्ट करून बसतो. त्यावेळी आई जळती फाळ घेऊन अंगावर धावते. त्यावेळी तिला म्हणजे आईला वाईट वाटते. ती स्वत:च्या स्तनातील दूध काढून वसंताला चहा देते. यातून वसंताचा हट्टी स्वभाव दिसून येतो.

वसंताला वार्षिक परीक्षा फी भरण्यासाठी पैसे नव्हते. त्यावेळी वसंता काम करून रेल्वे स्टेशनवर ती फी सीताफळे, करंज्या विकून भरतो. ही कष्टाळू वृत्ती खडतर परिस्थितीतून त्याने शिक्षण घेतले हे दर्शविते. दिवाळीच्या सणात सुद्धा त्याच्या अंगात फाटके कपडे असत. तरीसुद्धा गावातील पाच-पंचवीस मित्रासोबत दिवाळीच्या दुसऱ्यादिवशी तो नागोबा गावातून काढतो. अशा प्रसंगातून परंपरा जपण्याची वृत्ती त्याच्या अंगी होती हे दिसून येते.

प्रकाशच्या मदतीने वसंत कराडच्या कॉलेजात प्रवेश घेतो. दोघे भाऊ एका खोलीत राहतात. तिथे सुद्धा खडतर परिस्थितीत कॉलेज करावे लागते. कॉलेजमध्ये असताना अनेक पुस्तके वाचत. कथा कविता करण्यात वेळ घालवत. यातून वसंताचे वाङ्मयप्रेम, त्याची निर्मितीची क्षमता होती हे दिसते. वसंता सुरुवातीला अनेक मासिकांना कथा पाठवत. कधी त्या छापून येत. कधी तशाच परत येत. पण तो अपयशाला न घाबरता त्याने वाङ्मयनिर्मिती चालूच ठेवली.

कराडला असताना गणपतीच्या उत्सवात कराड शहरातील कार्यक्रमांना वसंता नेहमी जात असे. कथा कादंबरी लेखनाचा छंद असल्याने पुस्तक प्रकाशित करण्यासाठी त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला. पण त्या सर्व परिस्थितींतून त्यांनी पुस्तके प्रकाशित केली. पुढे ती पुस्तके अनेक कॉलेजवरती शाळेतून पायी पायी फिरून विकली. यातून साहित्यावरचे प्रेम दिसून येते.

वसंताला बी. ए. होऊनही नोकरी मिळत नव्हती. वर्तमानपत्रातील जाहिराती वाचून अर्ज भरण्याचा उद्योग सतत सुरू होता. बोलावणे आलेच तर फक्त नाव, गाव विचारून परत कळवते अशी उत्तरे मिळत. प्रत्येक ठिकाणी वेगवेगळे अनुभव येत. शेवटी त्यांचे मन होरपळून निघाले होते. सातारा, वडूज, दहिवडी, म्हसवड, पाटण, सांगली, आष्टा, तासगाव, वाई, इस्लामपूर अशा अनेक ठिकाणी फिरून पुस्तके घेण्यासाठी भेटी दिल्या. पण पुस्तके घेण्यापेक्षा त्यांना झिडकारले जात होते.

वसंताने स्वत:ला सावरले. पुढे नोकरी मिळणे कठीण झाल्याने कथाकथनाचा कार्यक्रम करून पैसा मिळवायचा धामणेरच्या हायस्कुलमध्ये पहिला कार्यक्रम झाला. पंधरा रुपये मिळाले. प्रकाशच्या मदतीने शिवाजी विद्यापीठात एम. ए. ला प्रवेश घेतला. त्यावेळी सुद्धा अनेक समस्यांना तोंड द्यावे लागले. प्रकाशच्या मदतीने सर्व अडचणी दूर झाल्या. अशा प्रकारे कोणत्याही संकटाला सामना करून सामोरे जाण्याची सवय वसंताला लागली. वर्तमानपत्रात कथा लिहून ते शांती या खानावळीचे पैसे दिले. एक ना अनेक समस्यांना तोंड देत एम. ए. झाले. एम.ए. करीत असतानाच बावीस ठिकाणी अर्ज केले होते. नोकरीसाठी वसंता नेहमी प्रयत्नशील होता.

प्रकाशच्या लग्नाची धावपळ सुरू असतानाच वसंताला म्हापसा कॉलेजचे मुलाखतीसाठी बोलावणे आले. प्रकाशचे लग्न व मुलाखतीची तारीख एकच होती. वसंताने मुलाखतीला जाण्याचे निश्चित केले. परंतु पावसामुळे एस. टी. आली नाही. म्हणून वसंता मुलाखतीस हजर राहू शकला नाही. तरी देखील दु:खी न होता वसंता मोठ्या भावाच्या लग्नात हिमतीने सहभागी झाला. प्रकाशने वसंताला 'नवजीवन विद्यालय' शिव येथे नेले. वसंताची तेथे निवड होते. थोड्याच कालावधीत त्यांनी शिक्षक, विद्यार्थी यांची मने जिंकून घेतली. यावेळी वसंता एका मुलीच्या प्रेमात पडले. परंतु पूर्वीच्या प्रकरणामुळे सावरले. पुढे नोकरीसाठी अर्ज करू लागले. महाराष्ट्र एक्सप्रेसने ते नीरा येथे आले. तेथून जवळच सोमेश्वर नगरच्या मु. सा. काकडे महाविद्यालयात आठ दिवसानंतर अधिव्याख्याता म्हणून रुजू झाले. एफ. वाय. बी. ए. च्या वर्गावर पहिला तास झाला. आजही ते त्याच महाविद्यालयात मराठी विभागात अधिव्याख्याता म्हणून काम पाहतात. आजही त्यांची साहित्य निर्मिती चालू आहे.

२) **बाबासाहेब बोधे (वडील) :**

कोकरउड्या या आत्मकथनातील बाबासाहेब बोधे म्हणजे वडील. लेखकाच्या वडिलांची व्यक्तिरेखा महत्त्वाची आहे. बाबासाहेब बोधे हे सरकारी खात्यात पोलिस म्हणून नोकरी करीत होते. त्यांना त्यांची मुले बापू म्हणत. ते स्वत: स्वभावाने छंदीफंदी वृत्तीचे होते. नोकरीमुळे त्यांना गावापासून दूर रहावे लागे. त्यामुळे मुले, पत्नी यांची अजिबात काळजी घेत नसत. स्वत: मात्र मटका, सिगारेट, बिडी, दारू इ. व्यसने त्यांना होती. केव्हातरी त्यांना मुलांची आठवण येत असे. विशेषत: कठीण प्रसंगाच्या काळात त्यांना स्वत:च्या परिवाराची आठवण येत असे. इतरवेळी ते स्वत:च्या धुंदीत रहात असत.

बापू स्वत: महिन्याला मनिऑर्डर पाठवीत. पण त्यांची आई, वडील ती घेत. त्याच्या परिवारास देत नसे. वसंताला व वसंताच्या आईस नेहमी छळत. वसंताच्या आईला स्वयंपाकाचे निमित्त करून मुलासह मुसळधार पावसात बाहेर काढले. त्यावेळी हौसाबाई त्या पावसात शेजारच्या छपरात रात्र उजडतात. दुसऱ्या दिवशी सातारला जातात. तेथे बापू भिंतीला टेकून बाईशेजारी बिडी ओढत बसलेले असतात. त्यावेळी आई बापूंना बोलते. त्यावेळी बापू तिला मारतात. बापूंनी साधी मुलांना ओळख सुद्धा दिली नाही. यावरून बापूंची छांदशी वृत्ती दिसून येते.

बऱ्याच काळानंतर बापूंच्या डोक्यात प्रकाश पडतो. त्यावेळी बापूंचे आईला माहेरी पत्र येते. त्यावेळी आईला आनंद होतो. आई दुधीला येते. त्यावेळी बापूंनी स्वत: जुने घर मोडून तिथे दुसरे तीन खोल्यांचे घर बांधले होते. बापाची नोकरी गेल्यामुळे अंगावरती फाटकी कपडे होती. गळ्यात फाटका मफलर होता. अशा अवस्थेत बापूंचे दर्शन होते. त्यामुळे पोटची मुले सुद्धा त्यांच्याजवळ येत नाहीत. नोकरी गेल्यानंतर आगाशिवाच्या डोंगरात बापू बुवा झाले होते. जेवणाची कोणतीच व्यवस्था नव्हती. उपाशी झोपावे लागत होते. अशा ठिकाणी आपला ठावठिकाणा लागणार नाही याची जाणीव होताच ते गावी येतात. आईनेच मुलांना हा तुमचा बाप आहे असे सांगतल्यानंतरच मुले बापूंजवळ गेली. त्यावेळी वडिलांची सावली मुलांच्यावरती प्रथमच पडते.

वसंता दुपारच्या वेळी घरी आला. त्यावेळी बापूंची त्यांच्या भावांशी भांडणे चाललेली होती. बापूंचा स्वभाव फार जिद्दी व हट्टी होता. त्यांनी दाण्यासाठी दाण्याची कणिंग खाली ओतली होती. तेव्हापासून बापू वेगळे राहू लागले. यातूनच त्यांच्या जिद्दी व हट्टी स्वभावाचे दर्शन होते.

बापू हुशार व बुद्धिमान होते. इंग्रजी बोलत. त्यांना नाटकांची आवड होती. स्वत: नाटकात काम केले होते. त्यांना वाचनाचा छंद होता. त्यांनी अनेक पुस्तके, मासिक वाचली होती. बापू नोकरीसाठी दिवसभर हिंडत. घरी येताना धोतराच्या सोग्यात ज्वारी घेऊन येत. अशातच आईला मुलगी झाली. त्यावेळी बापूंना मोठा आनंद झाला होता. ते म्हणतात, ''पोराचं काय खर हाय व्हय ? कवा खोंडावाणी येसन तोडून उधाळत्याली. पोरी चांगल्या. मुंगीवानी वारूळ धरून ऱ्हात्याला.'' (कोकरउड्या, पृ.४७) हे बापूचं मत योग्य आहे. मुले आई-वडील विसरतात. परंतु मुलींना मात्र त्यांच्याबद्दल प्रेम जिव्हाळा असतो. यावरून बापूंची दृष्टी व मुलींवरील प्रेम दिसून येते.

बापूंना चोरी केलेली आवडत नसे. वसंताने एकदा गावातील महादेव सुताराच्या शेतातून बटाटे चोरून आणल्याने आईला हिरवी पिवळी होईपर्यंत मार दिला. त्यावेळी आई बाळंतीण झाली होती. त्याचदिवशी पोस्टमन पत्र घेऊन आला. पत्र वाचताच बापूंचा चेहरा आनंदी झाला. लगेच बापू पाळण्याजवळ गेले. मुलीचा मुका घेतला. आईची सुद्धा बापूंनी चौकशी केली. हे सर्व पत्रामुळे घडले. बापूंना नोकरीवरती सी. आर. पी. मध्ये भरती होण्यास हैद्राबादला बोलावले होते. बापूंजवळ दयामाया फार कमी होती. कधी ते विचित्र वागत असत.

बापू कधी कधी वसंताला मजेने, ''काय वसंतराव फाकडे ... तीन ठिकाणी वाकडे ... पकडतात खेकडे'' असे म्हणत. नोकरी मिळाल्यानंतर महिन्याला ते मनिऑर्डर करीत. पोरांसाठी दूध असावे म्हणून त्यांनी पत्रात शेळी घ्या असे कळवल्यामुळे आईने पस्तीस रुपयांची शेळी विकत घेतली. शेळीचा वसंताच्या शिक्षणासाठी व कुटुंबासाठी भरपूर उपयोग झाला. यातून बापूंची प्रपंच्याची मुलांची काळजी व दूरदृष्टीपणा दिसून येतो.

बापूंच्या पत्रात विशेषत: हौसाचेच कौतुक असत. थोरला मुलगा प्रकाश सातवीला असताना बापूंची मनिऑर्डर थांबली. पत्रेसुद्धा कधी तरी येत. शेतीसुद्धा व्यवस्थित पिकत नव्हती. त्यामुळे कुटुंबाला वाईट दिवस आले होते. बऱ्याच दिवसांनी बापूंनी संसाराकडे लक्ष देण्यास सुरुवात केली. त्यामुळे त्यांचा लहरी स्वभाव दिसून येतो. मुलांना शाळेत शिरंब्यास पायी जावे लागते म्हणून त्यांनी सायकलीला पैसे पाठवले. यावरून बापूंची मुलांविषयीची आपुलकी पहावयास मिळते. बापू सुट्टीला गावाकडे येताना मुलांसाठी पेढे, करंडीभर फळे घेऊन येत. त्यामुळे घरामध्ये दोन-तीन दिवस मजेत जात असत. बापूंचे राहणीमान अगदी एखाद्या साहेबासारखे होते. अंगामध्ये चौकटी अर्ध्या बाह्यांचा शर्ट, इस्त्रीची पँट, पायामध्ये तांबडे बूट, हातामध्ये सिगारेटचे पाकीट, चमकणारा लायटर असाच

त्यांचा वेगळाच थाट असे. त्यांची कपडे ठेवण्यासाठी स्वतंत्र पेटी होती. स्वत: थाटामाटात राहत होते. पण मुले मात्र एखाद्या पालातल्या भिकाऱ्याच्या पोरासारखी उघडीवाघडी हिंडत असत. त्याचे त्यांना काहीच वाटत नसे. गावी आल्यानंतर महादेव सुतार नाही तर भावसाहेब अण्णाला मटका जुगार खेळायला लावत. मुलांची चौकशी करून त्यांना तालुक्याला नेऊन कपडे घ्यावीत असं या निगरगट्ट बापाला कधीच वाटले नाही.

"रद्दी जळावी तसा जुगाराच्या नादामध्ये अफाट पैसा बापूंनी घालवला... आणि आश्चर्य त्याचं त्यांना कधीच वाईट वाटलं नाही." (कोकरउड्य, पृ. ७४) असे बापू अमाप पैशाची उधळपट्टी करणारे व्यक्तिमत्त्व होते. बापूंना कधी मायेचा पाझर फुटला नाही. बापू नोकरीवर जाताना आईने नकुलाचे जेवण केले होते. सोबत वसंताही होता. दोघांनाही जेवायला वाढले. थोड्याच अवधीत जेवण संपवून वसंता बापूंच्या ताटाकडे बघत बसला. बापूंचे जेवण झाले. बापूंच्या ताटात राहिले. वसंताला आई खा म्हणते. लगेच वसंता पुढे धावतो. त्यावेळी बापू रागावतात. "हरामखोर... मघापासून पाहतोय ... साला घास मोजतोय भेंचोद. बापाच्या पोटातलें वकून पाडलं साला." (कोकरउड्या, पृ.७४) या बोलण्याने वसंतास खूप दु:ख झाले. यातूनच बापूंच्या तिरसट स्वभावाचा प्रत्यय येतो.

'कोकरउड्या' या आत्मकथनातून बापूंच्या मनाचा दिलदारपणा दर्शविणारा एक प्रसंग दिसतो. सासरवाडीची निम्मी जमीन बापूंना मिळणार होती. कोर्टाने तसा निकाल दिला होता. पण आई नको म्हणाली. या एकाच शब्दावर त्यांनी त्यांच्या मेव्हण्याला दत्तूबाळला पत्राने कळवले. हौसाबाईच्या वाट्याला आलेली जमीन तुम्हीच घ्या. याठिकाणी बापूच्या मनाचा मोठेपणा पहावयास मिळतो. तसे बापू नि:स्वार्थी होते.

बापू म्हणतात, "गावातले नांगरगट्टे पैसे साठवून जमिनी घेत. मी माझी तिन्ही पोर ग्रॅज्यूएट करणार." (कोकरउड्या, पृ.१२८) शिकलेली मुले याच माझ्या जमिनी. या बापूंच्या वाक्यातून बापूंना जमिनीपेक्षा मुलांचे शिक्षण महत्त्वाचे वाटते. त्यांच्यावरती ख्रिस्ती धर्माचा प्रभाव होता. ते प्रत्येक पत्रात 'प्रभू विपरीत न्याय कधीच करत नाही.' या विधानातून जाणवते.

### ३) हौसा (आई) :

'कोकरउड्या'तील हौसा ही महत्त्वाची व्यक्ती होय. कोरकउड्याचा नायक व. बा. बोधे यांची आई. 'अंकलखोप' हे तिचे माहेर. ते सोडून ती 'दुधी' या गावी आली. तिचे पती पोलिस

खात्यात नोकरीस होते. त्यामुळे त्यांना सातत्याने घरापासून दूर रहावे लागत असे. त्यांचा स्वभाव हा छंदी-फंदी होता. त्यामुळे त्यांचे कुटुंबाकडे दुर्लक्ष होत होते.

हौसा ही कुटुंबातील एक महत्त्वाची व्यक्ती असली तरी तिची सतत पिळवणूक होत राहिली. तिला सतत दु:खाला सामोरे जावे लागले. पण तिच्या ठिकाणी दु:खाला सामोरे जाण्याची जिद्द आहे. म्हणूनच ती या कुटुंबात टिकून राहिली. हौसाच्या वाट्याला नेहमी दु:ख आले आहे. म्हणून रवींद्र कोल्हे लिहितात, " 'कोकरउड्या' ही व. बा. बोधे यांची आत्मकथा असली तरी ती एक कथा आहे. दारिद्रयाशी सामना करणाऱ्या स्त्रीची."[१] हे कोल्हे यांचे मत योग्य आहे. कारण हौसाच्या ठिकाणी कोणत्याही प्रसंगाला सामोरे जाण्याची हिंमत आहे. एकूणच हौसाच्या आयुष्यात सातत्याने दु:ख आले. मात्र दु:खाला सामोरे जाण्याची तिची जिद्द महत्त्वाची होती. म्हणूनच हौसाची व्यक्तिरेखा प्रभावी आहे असे म्हणावे लागेल.

वसंताच्या जडणघडणीत हौसाचा फार मोठा मोलाचा वाटा आहे. प्रत्येक मुलाच्या जडणघडणीत आईचा वाटा असतोच. मात्र तिच्या कष्टाळू, जिद्दी स्वभावामुळेच 'कोकरउड्या' या आत्मकथनातील वडिलांपेक्षा एक प्रभावी व्यक्तिरेखा म्हणून आईचा उल्लेख करावा लागतो.

भरपावसात वसंताचा जन्म मामाच्या गावी झाला, त्यावेळी रात्र होती. हौसाला असाह्य वेदना होत होत्या. छपरातून पाणी गळत होते. अशा परिस्थितीत तिने मुलाला जन्म दिला. त्यावेळी तिला दवा नाही. दवाखाना नाही. तरी सुद्धा हौसा हिमतीने येईल तो दिवस कंठत होती. नवरा पोलिस नोकरीत होता. तो वेळच्या वेळेत पैसे पाठवत पण हौसाची सासू तिच्यापर्यंत पोहचू देत नसे. सासरा दीर तिचा शारीरिक छळ करीत असत.

हौसा सासू-सासऱ्याच्या शारीरिक मानसिक त्रासाला कंटाळून माहेरी येऊन रहाते पण तिथे सुद्धा तिला कष्टच करावे लागले. हौसाचा मुलाबाळांसाठी तिळतिळ जीव तुटत असे. हौसाबाईची देवावरती श्रद्धा होती. आपल्या पतीने चांगले वागावे यासाठी ती देवाला नवस करी. नवऱ्याचे संसारात लक्ष लागावे म्हणून तिने स्वत:चा उजवा हात देवाजवळ गहाण टाकला होता. ती डाव्या हाताने जेवत होती. कुणी विचारले तर ती म्हणते, 'नवरा माणसात यावा म्हणून देवाजवळ गहाण टाकलाय.' या सर्व प्रसंगातून हौसाचा श्रद्धाळूपणा, पतिनिष्ठा व अपार कष्ट करण्याची मानसिक तयारी इ. पैलूंचा प्रत्यय येतो.

हौसाबाई ही बाळंतपणासाठी माहेरी आली तरी तिला रानातील कामे करावी लागत. महादेव हा हौसाचा चुलतभाऊ मनाने खूप निर्मळ होता. त्यालाही पाच बहिणी होत्या. कोण्या मेहुण्याला सायकल घे, कोणाला अंगठी कर. अशा व्यापामध्ये तो व्यापून जात. साहजिकच त्याचे हौसाकडे दुर्लक्ष होत असे. त्यामुळे हौसा मुलाच्या पायातील वाळे महादेवकडे देते. कारण तिला सासरी दुधीला जाण्यासाठी पैसे हवे होते. रात्र असताना सुद्धा दोन लेकरांना पाठीशी घेऊन ती भिलवडी येथील रेल्वेस्टेशनमध्ये येते. रेल्वे पकडून ती रहिमतपूरला जाते. त्यावेळी अंधारच होता. त्यामुळे ती दोन पोरांना घेऊन एकनाथ हॉटेलवाल्याच्या हॉटेलात जाते. तो तसा देवमाणूस, स्वभावाने सरळमार्गी. त्याने तिची चौकशी केली, तिला व पोरांना शेव व चहा देतो. त्याची व हौसाची बऱ्याच दिवसाने गाठ पडली. त्यामुळे त्याला आनंद होतो. दिवस वर आल्यावर हौसा सासरची म्हणजे दुधीची वाट चालू लागते. सासरी हौसाच्या वाट्याला इकडे आड आणि तिकडे विहीर अशी अवस्था होते. हौसा दुधीत पोहचताच तिची सासू व दीर यांनी भांडणाला सुरुवात केली. पण त्या सर्वांना तोंड देत हौसा तिथेच रहात होती.

सासू-सासरे-दीर तिला नेहमी अपमानास्पद बोलत. तिची सासू तिला दगडी जात्यावर दळण दळण्यास लावत. पहिली गरम भाकरी होताच तिच्या मुलांना देत. पण हौसाच्या मुलांचा व हौसाचा विचार करत नाही. तिला शिव्या देत, तिच्या माहेरच्या लोकांना शिव्या देत. त्यावरती हौसा म्हणते, ''माझ्या माहेराचं नाव काढू नका.... पडेल ती काम करतीया मी.'' (कोकरउड्या, पृ.२३) यातून तिचे माहेरच्या लोकांवरती असलेले प्रेम दिसून येते. हौसाची सासू हौसाला कधी बसून देत नव्हती. मुलाला पाजण्यासाठी तिने मांडीवर घेतले असता सासू नेहमी खेकसायची. लगेच म्हणायची, ''पाळण्यात टाक की लोडण्याला. सारखा मांडीव घिऊन बसतीस ?'' (कोकरउड्या, पृ.२४) या सासूच्या खेकसण्यातून, सासूचा हौसाला किती त्रास असेल याची कल्पना येते. पोटच्या मुलाला सुद्धा पुरते पाजून देत नाही. एवढे सर्व दु:ख होऊन सुद्धा हौसा शांत बसत असे. यावरून हौसाबाईच्या अंगी असलेली सहनशीलता, दु:ख पचविण्यासाठी ताकद हे गुण दिसून येतात.

हौसाबाईस अनेक कठीण प्रसंगांना तोंड देण्याची सवय लागून गेली होती. दिवसभर शेतावर कष्ट करून घरी आली, त्यावेळी हौसाबाईबरोबर सासू स्वयंपाकाचे निमित्त करून भांडते. तिला पडत्या पावसात मारहाण करून घराबाहेर काढते. अशाच परिस्थितीत ती मुलांना घेऊन रात्री पडत्या पावसात गावाशेजारील असणाऱ्या छपरात रात्र काढते. सकाळी साताऱ्याला नवऱ्याकडे जाते. त्यावेळी

तिचा नवरा बाबासाहेब बोधे हे एका बाईच्या प्रेमात पडल्याचे तिच्या लक्षात येते. त्यावेळी हौसाबाई म्हणते, ''अजून हौस फिटली न्हाय व्हय ? कण्यारीच्या मुळ्या टेचून पाजा आमाला, जलमभर बाया ठेवा .... काय लाज आबरू ! सोन्यासारखी नोकरी. तीन पोरं. मी म्हणती माणसानं ध्यान धरावं मागल्या दिसाचं.'' (कोकरउड्या, पृ.२५)

यातून तिच्या मनातील दु:ख व्यक्त होते. स्वत:चा नवरा, मुले, पत्नी संसार असताना बाईच्या प्रेमात पडतो. त्यावरती ती भांडते. त्यावेळी स्वत:चा नवरा सुद्धा हौसाला पायातील चपलीने मारतो. तिच्या ओठातून रक्त येते. तिला हाकलून दिले जाते. अशा प्रकारची अनेक संकटे असली तरी न डगमगता आपल्या मुलांचे संगोपन ती करत होती. हौसाच्या अंगी सहनशीलता, धैर्य हे गुण दिसतात.

बऱ्याच दिवसांनंतर सुदैवाने बाबासाहेब बोधे यांना आपल्या परिवाराची आठवण झाली. त्यावेळी त्यांनी हौसाला पत्र पाठविले. ते पत्र पाहून आपल्या आईला किती आनंद झाला याबाबत वसंत बोधे लिहितात, ''आईला आबाळातला चांदुबा घावल्यावाणी झालं.'' (कोकरउड्या, पृ.३४) पत्र मिळाल्यानंतर आईने माहेर सोडले. सासरी जाण्याची तयारी केली. उशिरा का होईना जावयाच्या डोळ्यात प्रकाश पडल्यामुळे हौसाच्या वडिलांना आनंद होतो. भर ऊनातून हौसा आपल्या मुलांना घेऊन सासरी आली. तर पहिले घर मोडून बाबासाहेबांनी दुसरीकडे तीन खोल्या बांधल्या होत्या. नंतर हौसाबाईसह बाबासाहेब आईवडिलांपासून वेगळे राहू लागले. मात्र बाबासाहेबांची सरकारी खात्यातील नोकरी गेली.

हौसाचा स्वभाव चांगला असल्याने तिला गावातील सावतीन म्हातारीचा हौसाला मोठा आधार होता. हौसाबाईच्या मुलांना ती खाऊ देत असे. हौसाला नेहमी मदत करीत असे. आज ना उद्या चांगले दिवस येतील असा ती धीर देत. घराशेजारची शिंदीणबाई हौसाच्या मुलांना जुनेपाने कपडे देत. अशाप्रकारे गावातील थोड्याफार व्यक्तींचा हौसाच्या प्रपंचास हातभार लागला होता.

बाबासाहेबांना कुटुंबातील कोणत्याच व्यक्तीविषयी फारशी आस्था नव्हती. म्हणून हौसाबाई बाबासाहेबांविषयी ''वांडरागत काळीज इसरून आलायसा झाडाव.'' (कोकरउड्या, पृ. ४९) असे म्हणत. दुपारच्या वेळी लेखक घरी आला असताना आईने चहा केलेला तेव्हा प्रकाश चहा पित होते. ते पाहून लेखक आईस चहा मागतो. त्यावर हौसाबाई रागावते. पण लेखक समजून घेत नाही. त्यावर हौसाबाई म्हणते, ''घालीन कनका ऱ्याट गीळ पैलं.''(कोकरउड्या, पृ.५१) तरी सुद्धा लेखक म्हणतो मला चहा पायजे. आता उटली मजी हानीन फुकनीनं. मग परकासला का दिलास ?'' मला बी पायजे.

"आर बाबा, दुधाचा टाक न्हाय घरात."

"त्याला कसा दिलास दुधाचा च्या."

"पायजे तर कोरा करून देती भूनभून नको."

आई विझलेली चूल पेटवून चहा करून देते पण लेखक दुधाचाच चहा मागतो. तरी आई समजावून सांगते. पण लेखक तयार होत नाही. मग हौसाचा राग वाढतो. "आता नरड्यातच घालती लै दमीवलस त्वा... का लागलायस मागं रोगा ?" (कोकरउड्या, पृ. ५२) आई जळती फाळ घेऊन लेखकाच्या अंगावर धावते. लेखक पाया पडतो. मग हौसाला वाईट वाटते. त्यावेळी ती आपल्या स्वत:च्या स्तनातून अर्धा कप दूध काढून दुधाचा चहा करून देते. अशी ही वसंताची प्रेमळ, मायाळू, मुलाची इच्छा पूर्ण करणारी हौसाबाई आहे.

हौसाबाई कथा-कीर्तनाला कधीच गेली नाही. ती आपले काम हीच पूजा मानते. कधीच तिने कष्ट न करता कुणाकडून चार पैशाची अपेक्षा केली नाही. दारापुढे चार शेरडं करडं, शेतातील पीक आणि घरात खेळणारी मुलं हेच तिच्या जीवनाचे स्वप्न आहे. अखेरपर्यंत त्यापाठीमागे धावत राहिली. हौसाबाईचा देवावर विश्वास होता. परंतु आपले काम करून ती देवधर्म करीत असे. इतरांप्रमाणे देवळात जाऊन पोथी पुराण भजन कीर्तन ऐकणे तिला पटत नव्हते. म्हणून ती देवळात जात नव्हती. तिच्या समोर येणाऱ्या अडचणीला तोंड देण्याचे सामर्थ्य तिच्यात होते म्हणून तिने स्वत:च्या दु:खाचा पाढा कधी कोणासमोर वाचला नाही.

शेरडं करडं, कोंबड्या, कुत्र, रान, मुलं यांच्याशी ती समरस असते. म्हणून सुधाकर भोसले हौसाबाईबद्दल म्हणतात, "या माउलीची नाव हौसा. पण हिला कोणतीही हौस पूर्ण करता आली नाही. किंबहुना कष्टमय जीवनाच्या घबडग्यात तिच्या हौसेचा अंकुर फुटलाच नाही."[२]

सुधाकर भोसले यांचे विधान बरोबरच आहे. हौसाच्या जीवनात नेहमीच दु:खाचे प्रसंग आले. तिला सुखसमाधानं हौस मौज करता आली नाही. यातून तिचा साधेपणा दिसून येतो. हौसाबाई कधी स्वत: कुणाशी भांडत नसते. पण एखाद्याने भांडणास सुरुवात केली तर ती त्याला चांगला धडा शिकवत असे. तिचा आवाज फार मोठा. वसंताला तिचे भांडण ऐतिहासिक वाटे.

शेतातून हौसा घरी आल्यावर लेखक चांदोबाच्या गोष्टी वाचत बसे. त्यावेळी त्याच्यावर रागवत असे. त्याला म्हणते, "बघावं तवा बामनावाणी वाचत असतय." (कोकरउड्या, पृ. ६३) तिला वाटायचं आता कामधान करावं पोरानं.

हौसाबाई मुलांना कधीसुद्धा उपाशी पोटी झोपून देत नसे. प्रसंगी पावसातही चार घरे धुंडून पीठ आणते, कधी कधी नुसते ओले घेवडे, चवळी उकडून घालते. बाबासाहेबांची मनिऑर्डर थांबली की स्वत: गावापासून चार मैल उन्हाची चालत जाते. सोनाराकडे पितळेची भांडी गहाण ठेवत. पण मुलांच्या शिक्षणाचा खर्च भागवत.

वसंताची जेव्हा नोकरी सुटते त्यावेळी वसंत ढेकणाचे औषध पितो. त्यावेळी हौसाबाई म्हणते, ''आरं उपाशीपोटी चिमणीगत पोरं दातात धिवून हिंडली पर न्हाय कवा जीव द्यावासा वाटला. मर्दासारखा मरद तू ... ढेकणाचं औषध पेतूयास भाड्या. काय लाज जिवाला ?'' (कोकरउड्या, पृ. १९४) हौसाबाई ही येईल त्या परिस्थितीला सामोरे जात. तिने कधी हिंमत गमावून दिली नाही. ती नेहमी स्वाभिमानाने जगली. वरील तिच्या विधानातून मुलाला आधार देते. यातूनच तिची जिद्द, चिकाटी दिसून येते. कधी कधी स्वत: महारवाड्यात पंडिताला आपला हात दाखवते. भविष्य पाहते. आपला भोग सरला का विचारते. कालांतराने तिची मुले सरकारी नोकरीत लागतात तेव्हा तिला सुखाचे थोडेफार दिवस येतात.

वरील अनेक प्रसंगांतून प्रस्तुत आत्मकथनातील एक महत्त्वाची व्यक्तिरेखा म्हणून हौसाबाई या व्यक्तिरेखेकडे आपणास पाहता येते. कोकरउड्यातून व. बा. बोधे यांचे जीवन चरित्र उलघडत असले तरी संपूर्ण कथा त्यांच्याबरोबरच लेखकाची आई हौसाबाई भोवतीही फिरते. संपूर्ण आशयसूत्रातून हौसाबाईंच्या स्वभावाचे अनेक पैलू प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे उलघडून दाखविता येतात. तिच्यातील कष्टाळूपणा, मुलांविषयीचे अपार प्रेम, पतिनिष्ठा, बाणेदारपणा, मुलांनी शिकावे यासाठी कोणतेही कष्ट उपसण्याची तयारी यासारखे महत्त्वपूर्ण स्वभावविशेष दिसून येतात.

## ४.३ इतर गौण व्यक्तिरेखा :

'कोकरउड्या' या आत्मकथनात प्रमुख व्यक्तिरेखा बरोबरच काही गौण व्यक्तिरेखाही आहेत. त्यात प्रकाश, कौसा, वसंताला भेटलेले शिक्षक इत्यादी व्यक्तिरेखा महत्त्वाच्या वाटतात.

### १) प्रकाश :

प्रकाश हा वसंताचा मोठा भाऊ. वसंता व त्याच्यानंतर उत्तम आणि शेवटची कौसा. अशी ही बहीण-भावंडे. प्रकाशचा स्वभाव चिडका होता. आई सोडली तर तो कुटुंबात कुणालाही घाबरत नसे. त्याच्यावरती आईचा थोडा दबाव असे. प्रकाश हा मुळातच हुशार असल्याने परीक्षेत पहिला येत सातवीला प्रकाश पहिल्या क्रमांकाने पास झाला. त्यावेळी सातवीला खूप महत्त्व होते. तशी त्यांची

घरातही मदत होत असे. बापूंनी घेतलेली सायकल तो जिवापाड जपतो. त्यांची कपडे साधीच. ती स्वच्छ असत. यावरून त्याच्या अंगी स्वावलंबन हा गुण दिसून येतो. नुकतेच भारत-चीन युद्ध संपले. त्यावेळी त्यावरती कविता तो करीत असे. यावरून त्याच्या अंगी देशप्रेम, राष्ट्राभिमान होता हे दिसून येते. प्रकाश सातारारोडला ग्रामसेवकाची नोकरी करून वसंताला शिक्षणासाठी पैसे पुरवीत. यातून त्याचे बंधुप्रेम दिसते. वसंताला एक-दोन ठिकाणी प्रकाशने नोकरी लावली होती. पण वसंता काहीतरी भानगडी करून नोकरी घालवीत. तरी तो त्याला त्रास देत नसे. त्याचा तो त्रास सहन करीत पुढे वसंताला एम. ए. ला प्रकाशनेच पाठवले. पडत्या काळात तो नेहमी मदत करत असे. पुढे मामाच्या मदतीने स्वत: बहिणीचा विवाह करून दिला. प्रकाश हा कुटुंबासाठी नेहमी झटणारी, कष्ट करणारी प्रामाणिक व्यक्ती होती. उत्तम हा प्रकाशचा व वसंताचा लहान भाऊ आहे. उत्तम हा लहान असल्यामुळे आईचा त्याच्यावर जीव होता. 'कोकरउड्या' या आत्मकथनात उत्तमचे अत्यल्प प्रमाणात चित्रण आले आहे.

**२. कौसा :**

कौसा ही वसंताची बहीण आहे. कौसावरती बापूंचे जास्त प्रेम होते. तिन्ही मुलांवरती नावापुरते प्रेम होते. कौसाच्या जन्मानंतर बापूंना आनंद होतो. कारण त्याच्या मते मुले आईबापाला विसरतात.मुली विसरत नाहीत. ती जन्मली तेव्हा बापूंना नोकरी लागते. म्हणून तिच्यावर त्यांचा जीव होता. पत्रात तिचेच नेहमी कौतुक करीत. प्रकाश, उत्तम, वसंता शाळेत असताना भाकरी खाण्यासाठी त्यांची भांडणे लागत. त्यावेळी आई भाकरीचे तीन तुकडे करून देत. त्यात कौसा बाजूलाच असत. पण कधी ती भांडत नसे. यातूनच तिचा शांत स्वभाव दिसून येतो.

वसंतासुद्धा तिला येताना खाऊ घेऊन येत असे. तिचा तासगावातील मुलाशी विवाह झाला. एकंदरीत कौसाही गरीब स्वभावाची होती. तिने कधीच हट्ट केला नाही. कुणाशी कधीच भांडण केले नाही. कुणाशी कधीच भांडण केले नाही म्हणून ती सर्वांची लाडकी होती. कौसामुळे या आत्मकथनाचा उठावदारपणा जाणवतो.

**३. बाबासाहेब माने व दीदी :**

वसंता रहिमतपूरच्या राधाकृष्ण विद्यालयात नोकरीस होता.त्या संस्थेचे संस्थापक म्हणजे बाबासाहेब व त्यांची पत्नी दीदी. ही वसंताच्या जीवनातील देवमाणसे. वसंताने ढेकणाचे औषध पिले तेव्हा बाबासाहेबांनी त्यांना दवाखान्यात नेले. दीदींनी स्वत:च्या मुलासारखा आधार दिला. स्वत: दवाखान्याचे पैसे त्यांनी दिले. यातून त्यांच्या मनाचा मोठेपणा दिसून येतो.

## ४.४ वसंताला भेटलेले शिक्षक :

'कोकरउड्या' या आत्मकथनाचा नायक वसंता जन्मताच त्याच्या पाचवीला दारिद्रय पुजलेले असल्याने त्याचे बालपण दारिद्रयात होरपळून निघालेले आहे. दारिद्रयातून बाहेर पडण्यासाठी आई वसंताला शाळेत घालते. शाळेतील शिक्षकांचा त्यांना घडवण्यात मोलाचा वाटा आहे.

### १) ताटे गुरुजी :

'कोकरउड्या' या आत्मकथनातील ताटे गुरुजी व मदने गुरुजी ही एक महत्त्वाची व्यक्तिरेखा आहे. प्रकाश पहिलीत असताना त्याला ताटे गुरुजींचे दर्शन झाले. अंगात तीन बटणांचा सदरा, लांब पायजमा. केस पाठीमागे वळविलेले. रंगाने सावळे ताटे गुरूजी बापूंचे मित्र. त्यामुळे वसंतावरती त्यांचे विशेष लक्ष असे. वसंताला त्यांनी कधीच मारले नाही. ताटे गुरुजीविषयी आदराची भावना होती. वसंतावरती ताटे गुरुजींमुळे चांगले संस्कार घडले.

### २) मदने गुरुजी :

ताटे गुरुजींच्या जागी मदने गुरुजी आले. पोहण्याच्या नादात वसंताला शाळेत उशीर होतो. वसंताला पाहून मदने सर मोठ्याने ओरडतात 'या मालक'. एकाएकी कानाखाली फाडकन आवाज निघाला. त्यामुळे वसंता वेळेत येऊ लागला. मदने गुरुजी गणित शिकवीत. वसंताचा गणित विषय कच्चा होता. पण मदने गुरुजींमुळे प्रगती झाली. त्यांच्यामुळे वसंताला चांगली शिस्त लागली. शिस्तीने कडक असूनही ते गावातील मुलीच्या प्रेमात पडतात. त्यामुळे त्यांची नोकरी जाते.

### ३) कदम गुरुजी :

वसंत चौथीत असताना कदम गुरुजी रहिमतपूर या गावाहून सायकलवरून येत. अंगात स्वच्छ कपडे, त्याचबरोबर लहान पिशवी. ती पिशवी म्हणजे छोटेस दुकान होते. त्यामध्ये सूर्यछाप पेपर, रंगीत वासाच्या पट्ट्या, शाईच्या पुठ्या दौती, निप इत्यादी साहित्य विद्यार्थ्यांसाठी ठेवत. यावरून कदम गुरुजींना विद्यार्थ्यांची काळजी दिसून येते. तळमळीने शिकवणारे आदर्श शिक्षकच होते. त्यांना शिस्त प्रिय होती. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनात त्यांच्याबद्दल आदराची भावना होती. वसंताच्या मनावर कदम गुरुजींनीही संस्कार केले.

### ४) माने गुरुजी :

शाळेमध्ये एक प्रामाणिक व्यक्ती म्हणून माने गुरुजी ओळखले जात. प्रकाशचा शाळेत पहिला नंबर आल्यामुळे माने गुरुजींनी त्याचे अभिनंदन केले. या प्रसंगातून माने गुरुजी विद्यार्थ्यांना

प्रेरित करणारे होते. विद्यार्थी घडवण्यात माने गुरुजींचा महत्त्वाचा वाटा होता. गुरुजींनी दिलेले ज्ञान वसंताला फार उपयोगी पडले.

अत्रे गुरुजी हे मुख्याध्यापक होते. व्याकरण हा विषय ते अत्यंत चांगला शिकवीत. त्यामुळे विद्यार्थ्यांना आदर वाटे. तसेच भोसले गुरुजी वसंताचे वर्गशिक्षक होते. ते अतिशय शुद्ध बोलत. कधी-कधी रेडिओवरील बातम्या ऐकण्यासाठी मुलांना घरी नेत. यातून त्यांचे विद्यार्थिप्रेम दिसून येते. वेळेत न येणाऱ्या विद्यार्थ्यांला शासन करत. वसंताला शिस्त लावण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे.

त्याचबरोबर बर्गे सर, शिंदे सर, जाधव सर, बिडवे सर यांचाही वसंताला घडविण्यामध्ये महत्त्वाचा वाटा आहे.

**वसंताच्या जीवनातील महत्त्वाच्या व्यक्ती :**

वसंताला घडविण्यामध्ये जसा शिक्षकांचा महत्त्वाचा वाटा आहे तशा इतरही वसंताला महत्त्वाच्या व्यक्ती भेटल्या होत्या. त्यांचा परिचय करून देता येईल.

वसंत आजोळी असताना आप्पा मामा त्याला जवळचा वाटत कारण त्याचा स्वभाव अत्यंत मायाळू होता. तो वसंताच्या आईला संकटात मदत करीत. त्यामुळे तो जवळचा वाटत होता. वसंताला त्याच्याविषयी आदर वाटे. गोपाल मामा वसंताशी व्यवस्थित बोलत नसे. परंतु त्याचा स्वभाव अत्यंत गरीब होता. महादेव मामा हा वसंताचा चुलत मामा असून तो त्यांना मदत करीत. त्यांच्या घराभोवती भरपूर झाडे पाणी होते. त्यामुळे वसंता त्याच्या घरी रमत असे.

म. भा. भोसले हे जुन्या पिढीतील ग्रामीण कथालेखक होते. वसंता वर्गामध्ये शिकत असताना 'उघड्या जगात' ही त्यांची कादंबरी वसंताने वाचली होती. पुढे त्यांना वसंता भेटायला गेल्यानंतर वसंताची चौकशी केली. वसंताला लेखनासाठी प्रोत्साहन दिले. त्यामुळे वसंता अधिक उत्साहाने लिखाण करू लागला.

कोल्हापूर विद्यापीठामध्ये रजिस्ट्रार म्हणून कार्यरत असणाऱ्या उषा इथापे यांच्याशी एम. ए. च्या स्वागत समारंभात त्यांची ओळख झाली. वसंताची नेहमी चौकशी करत त्याला प्रोत्साहन देत. तसेच अडचणीच्या वेळी मदत करीत. त्यामुळे वसंताला कोल्हापुरात सर्वांत मोठा आधार होता.

वसंताच्या जीवनात त्याचे मित्रही मदतीला धावत. त्याला मित्राचा पडत्या काळात आधार होता. जशी वसंताच्या जीवनात माणसांना स्थान होते तसेच भुजी शेळीलाही महत्त्वाचे स्थान आहे.

पुस्तक छपाईसाठी अनेकवेळा या शेळीमुळे पैसा उपलब्ध झाला. प्रत्यक्ष बोकड विकताना वसंताच्या डोळ्यात पाणी येते. यावरून वसंताचे प्राण्यांविषयीचे प्रेम दिसून येते.

अशा रीतीने 'कोकरउड्या' या आत्मकथनातील व्यक्तिरेखांचा आढावा घेतला. काही व्यक्तींना स्वभावाने व परिस्थितीने गरीब तर काही मोठ्या मनाच्या यासर्व व्यक्तींचा वसंताशी संबंध जोडलेला आहे.

## ४.६ निष्कर्ष :

१) 'कोकरउड्या' या आत्मकथनातील व्यक्तिचित्रणे आत्मकथनाची गुणवत्ता वाढवितांना दिसतात.

२) 'कोकरउड्या' या आत्मकथनातील व्यक्तिरेखा या ग्रामीण भागातील जीवन जगणाऱ्या असल्याने त्यांच्या संवादाची भाषा ही ग्रामीण आहे.

३) 'कोकरउड्या' या आत्मकथनातील व्यक्तिरेखा यांचे आपल्या गावावरील शेती भातीवरील त्याचबरोबर प्राण्यांवरील असणारे प्रेम दिसून येते.

४) 'कोकरउड्या' या आत्मकथनातील व्यक्ती या आर्थिक परिस्थितीने कमकुवत असल्या तरी स्वाभिमानी व संस्कारशील आहेत.

५) 'कोकरउड्या' या आत्मकथनाची भाषा खास ग्रामीण ढंगाची व सातारी बोलीचा अस्सल वाण असून यातील मुख्य पात्र आई (हौसाबाई) आहे. त्यामुळे आत्मकथनाचा नायक वसंताच्या जीवनाला आकार मिळतो.

६) हौसाबाईच्या अंगी कोणत्याही प्रसंगाला सामोरे जाण्याचे धैर्य होते. म्हणून तिने स्वत:च्या जीवावरती मुलांना मोठे केले.

७) हौसाबाईचा पती कितीही वाईट व विचित्र वागत होता तरी तिची त्याच्यावरती श्रद्धा होती.

८) 'कोकरउड्या' या आत्मकथनाचा नायक हा शांत स्वभावाचा असला तरी स्वत:च्या पायावरती उभे राहण्यासाठी केलेली धडपड यातून कष्टाळू वृत्ती दिसून येते.

९) प्रकाश, वसंता, उत्तम, कौसा या बहीणभावंडात एकमेकांना सहकार्य करण्याची वृत्ती दिसून येते.

## संदर्भ सूची


१) कोल्हे रवींद्र : 'दैनिक तरुण भारत', प्रा. व. बा. बोधे यांच्याकडून प्राप्त झालेला लेख.

२) भोसले सुधाकर के. : साहित्यसूची : ग्रंथनाम विशेषांक, ऑगस्ट १९९६, पृ. ९१


-----x-----

# ब) 'रानपालखी' आत्मकथनातील व्यक्तिरेखा

## ४.१ प्रास्ताविक :

'रानपालखी' हे व. बा. बोधे यांचे आत्मकथन २००३ या वर्षी प्रकाशित झाले. 'कोकरउड्या' या आत्मकथनात जन्मापासून ते वयाच्या सत्तावीस वर्षापर्यंतचा कालखंड येतो. आणि 'रानपालखी'त सोमेश्वराच्या मु. सा. काकडे महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून रूजू झाल्यापासूनचा जवळजवळ पंचवीस वर्षाचा पट या आत्मकथनात उलघडलेला दिसून येतो.

व. बा. बोधे हे प्राध्यापक झाल्यापासून त्यांना जे अनुभव आले, त्यांना जे संघर्ष करावा लागला, याचे त्यांनी दर्शन प्रस्तुत आत्मकथानातून मांडलेले आहे. बोधे यांच्या वाङ्मयीन व सामाजिक व्यक्तिमत्त्वाचे दर्शन या आत्मकथनातून घडताना दिसते. जीवनविषयक अनुभवांचे, व्यक्ती म्हणून झालेल्या जडणघडणीचे, जीवनातील मानसन्मानाचे, अपमानाचे, संघर्षाचे कलात्मक वास्तवदर्शी चित्रण प्रस्तुत आत्मकथनात केले आहे.

'रानपालखी' या आत्मकथनात अनेक व्यक्तिचित्रणे आली आहे. त्या व्यक्तींचा आणि लेखकाचा संबंध आलेला आहे. व. बा. बोधे यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांग शोध घेण्यासाठी या व्यक्तिरेखांचा परिचय तेवढाच महत्त्वाचा आहे.

## ४.२ 'रानपालखी'तील प्रमुख व्यक्तिरेखा :

### १) आत्मकथनाचा नायक (वसंता) :

'रानपालखी' या आत्मकथनातील मध्यवर्ती व्यक्तिरेखा स्वत: लेखक असून त्याच्याभोवती सर्व घटना, प्रसंग घडत आहेत. जन्मगावीच त्यांचे बालपण गेले. वडिलांच्या छांदशी स्वभावामुळे त्यांना खूप त्रास सहन करावा लागला. घरची परिस्थिती ही गरिबीची होती. गरीब परिस्थितीत सुद्धा लेखक शिक्षण घेतो. शिक्षण घेताना अनेक प्रश्न निर्माण होतात. त्यांच्या आईने शिक्षणासाठी खूप कष्ट केले होते.

वसंता पहिल्यापासून लेखन, वाचनात मग्न असत. त्यामुळे त्यांचे शिक्षण पूर्ण होते. नोकरीसाठी स्वत: प्रयत्न करतो आणि सोमेश्वरनगरच्या मु. सा. काकडे महाविद्यालयात मराठी विभागात प्राध्यापक म्हणून रुजू होतो. नोकरी लागल्यानंतर त्याला समाधान वाटते. परंतु तेथेसुद्धा लेखकास अनेक कटू प्रसंगांना तोंड द्यावे लागते. लेखक तिथे जर्मन शेडमध्ये राहतो. तेथे गेल्यापासून जेवणाचा मासिक

डबा पंधरा रुपयाने वाढतो. राहण्यासाठी योग्य जागा नसते तरी तो तेथे राहतो. यातून लेखकाची सोशिक क्षमता दिसते.

लेखक संस्थेतील प्रत्येक व्यक्तीशी आदराने वागत, विशेष घुनळीकर सर त्यांना आदर्श वाटत. त्यांच्याशी नेहमी साहित्याच्या गप्पा मारत. प्राचार्य घुनळीकर लेखकाला नाटकातील संवाद व महानोरांच्या कविता म्हणावयास सांगत. लेखक त्यांच्यासाठी म्हणत. यातून त्यांचा आज्ञाधारकपणा दिसून येतो. जर्मन शेडमध्ये नवीन येणाऱ्या शिक्षकाची जेवणाची व राहण्याची जबाबदारी घुनळीकर लेखकावरती सोपवतात. स्वत: लेखक जातीने काम करीत. लेखकाला सुरुवातीला विद्यार्थ्यांशिवाय फारसे कोणी ओळखत नव्हते. परंतु निकेतनपुढे पंधरा ऑगस्टला भाषण करण्याची संधी मिळते आणि त्यामुळे त्या परिसरातील माणसे त्यांना ओळखू लागतात. संस्थेचे डायरेक्टर स्वत: त्यांचे अभिनंदन करतात. त्यांच्या प्राध्यापक जीवनातील ते महत्त्वाचे भाषण ठरते. लेखक वाचन लेखन यात विशेष रमत.

प्रत्येक शनिवारी-रविवारी लेखक आपल्या गावी आईसाठी जात. आईची त्याला काळजी वाटत असे. शिक्षणासाठी आईने खूप कष्ट घेतले होते. शेतीतील कामाने आईची धावपळ लेखकाला बघवत नाही. म्हणून तो आईस म्हणतो, "ह्यो राग टाक ईकून, पातीव बसून भांगालणार का शेरड राखणार?" (रानपालखी, पृ. १२) रानातील कामाचा व शेळ्यांचा आईस त्रास होतो. म्हणून शेळ्या विकण्यास सांगतो. यातून लेखकाचे आईवरील प्रेम दिसते.

आपल्या गावात सर्वांच्या घरी लाईट आहे. परंतु आपल्या घरी लाईट नाही. त्यावेळी आईच्या सांगण्यावरून पहिल्या पगारात लाईटला लेखक पैसे भरतो. गळणारे घर स्वत: कुंभाराकडून शेकरून घेतो. यातून लेखकाच्या प्रापंचिक जबादारीचे दर्शन घडते. लेखक सुट्टीच्या दिवशी शेळ्या राखतो. आईसोबत भांगलणीचे काम करतो. वसंताचे वडील त्यांना प्रत्येक वेळी साहित्याच्या संदर्भात विचारीत. वसंत त्यांना स्वत: सर्व गोष्टी सांगत. वडिलांनी घराचे बांधकाम करण्याचे काम तिन्ही मुलांवरती सोपविले. त्यावेळी लेखकाला सर्व आर्थिक व्यवहार सांभाळण्यास सांगतात.

वसंतला वडिलांनी दिलेल्या पैशातून तो घराचे सर्व काम करून घेतो. वडिलांनी दिलेला पैसा संपताच स्वत:चा पैसा वापरतो. परंतु काम पूर्ण करतो. प्रामाणिकपणा हा जणू त्यांचा स्थायी भावच होता. घराच्या कामात स्वत: अंगमेहनत करीत. त्यावेळी त्याला खूप त्रास होतो. परंतु तो सहन करतो.

गावाविषयी लेखकाला विशेष आस्था होती. आपल्या जन्मगावात काहीतरी करावे असे त्याला वाटते. त्यामुळे तो गावातील मारुतीच्या मंदिराचा जीर्णोद्धार करण्याची जबाबदारी स्वत: घेतो. यातून लेखकाची धार्मिक वृत्ती दिसते. त्यामुळे मंदिराचे काम करण्यासाठी स्वत: पावतीपुस्तक छापतो. मित्रांच्या मदतीने खपवतो व निधी गोळा करतो. काम पूर्ण व्हावे म्हणून स्वत: निधीसाठी व्याख्याने देतो व मिळणारे मानधन या कार्यात वापरतो. त्या निधीसाठी त्याला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागले. परंतु स्वत: त्यावरती मार्ग काढतो. पण गावातील मंदिराचा जीर्णोद्धार करतो. मंदिराच्या जीर्णोद्धाराच्या वेळी लेखकाला अनेक व्यक्तींचा रोष पत्कारावा लागतो. परंतु स्वत: त्यांना विश्वासात घेऊन कार्य पूर्णत्वास नेतो. कोणत्याही व्यक्तीचे मन दुखावत नाही. एकूणच लेखकाच्या शांत व संयमी स्वभावाचे दर्शन येथे घडते.

आपल्या गावातील तरुण मुलांनी शिकावे. सुशिक्षित व्हावे असे लेखकाला मनापासून वाटते. त्यांनी लेखन, वाचन करावे. आपल्या गावाचा लौकिक वाढवावा या भूमिकेतून स्वत: गावात वाचनालय सुरू करतो. त्याही कार्यात लेखकास गावातील ठरावीक व्यक्तींचा विरोध होतो. परंतु त्याच्यातून मार्ग काढतो. त्यासाठी मुंबईला स्वत: हेलपाटे घालतो. स्वत:ची काही पुस्तके वाचनालयाला भेट देतो. वर्तमान पत्रांची बिले लेखक स्वत:च भरतो. काही नवनवीन पुस्तकांची खरेदी करतो. त्यासाठी गावातील चांगल्या व्यक्तींची मदत घेतो. या सर्व कार्यात त्यांना खूप अडचणी निर्माण होतात. त्यातूनही तो जिद्दीने वाचनालय सुरू करतो. यातूनच त्यांचे साहित्यावरील प्रेम दिसून येते.

ग्रामपंचायतीत वाचनालय सुरू होते. परंतु त्यांच्यासाठी स्वतंत्र खोलीची गरज भासते. त्यावेळी सुद्धा लेखकाने खोली बांधण्यासाठी प्रयत्न केले. वाचनालयासाठी स्वत:ची जागा व इमारत बांधली होती. वाचनालयात कार्यभार व्यवस्थित चालण्यासाठी त्यांनी गावातील हुशार दोन मुलांची नेमणूक केली. स्वत: प्रत्येक सुट्टीला गावी येऊन कामकाजाची सर्व पाहणी करतो. गावातील सर्व व्यक्तींना एकत्र करून गावात अनेक सुविधा निर्माण करण्यात लेखक नेहमी प्रयत्नशील राहतो.

गावाची यात्रा मोठी भरावी गावदेवीला सर्वांनी एकत्र यावे. त्या गावदेवीचा गुलाल अंगावरती पडावा. पाहुण्यांनी गावात हजेरी लावावी. तसेच गावात तमाशा व कुस्त्याचा मोठा फड भरावा. असे लेखकाला वाटते. त्यासाठी स्वत: गावाची यात्रा भरवतो. १९९० ते १९९७ या काळात लेखक स्वत: सात वर्षे गावची यात्रा व्यवस्थित पार पाडतो. वर्गणीसाठी गावातून स्वत: फिरतो. कुस्त्यांचा व तमाशाचा चांगला फड भरवतो. परंतु आठवे वर्ष मात्र त्यांना त्रासदायक जाते. त्यावेळी गावात दोन

गट निर्माण होतात. लेखकाच्या विरोधात गाव जातो. लेखक व त्यांचे भाऊ आणि ठरावीक लोक त्यांच्या पाठी उभे राहतात. वर्गणी देण्यास नकार देतात. त्यावेळी वसंताला खूप त्रास झाला.

तमाशाच्या दिवशी वसंताला मारण्याची धमकी गावातील टवार पोरे देतात. परंतु लेखक शांतपणे त्या प्रसंगाला सामोरे जातो आणि यात्रेतून पूर्ण अंग काढून घेतो. शेवटी लेखकाला खूप वाईट वाटते. वसंत व त्याचे वडील यांच्यात थोडे मतभेद होतात. त्यातून लेखक रागावून जातो.

लेखक स्वत: दोनचाकी गाडी घेतो. त्यावेळी त्याच्यावरती कर्ज होते. त्या काळात त्याला खूप मेहनत करावी लागते. मुलाच्या व पत्नीच्या आजारपणात पैशाची ओढाताण होते. तरीसुद्धा लेखक दु:खी होत नाही. प्रत्येक प्रसंगी तो खंबीरपणे उभा राहतो. परंतु संसारात कोणतीही गोष्ट कमी पडून देत नाही. लेखकाने घेतलेले कर्ज वेळेत भरता येत नाही. त्यावेळी त्यांच्यावरती जप्तीची नोटीस येते. त्यावेळी त्यांचा विद्यार्थी ते भागवतो. यातूनच लेखकावरील विद्यार्थ्यांचे प्रेम दिसते.

लेखकाची व्यक्तिरेखा ही आत्मकथनातील प्रभावी व्यक्तिरेखा आहे. नोकरीच्या निमित्ताने स्वत: बाहेरगावी असून सुद्धा आईवरती त्याचा जीव होता. गावासाठी काहीतरी चांगले करावे. यासाठी धडपडणाऱ्या गावातील तरुणांना योग्य मार्ग दाखवणारी स्वत: गावाची सात-आठ वर्षे यात्रा भरवणारा तसेच संस्कृतीची जपणूक करणारा एक ग्रामीण माणूस, प्राध्यापक, साहित्यिक व सामाजिक बांधीलकी, संस्थेशी प्रामाणिक, विद्यार्थी प्रेमी इ. गुणांचा समावेश या व्यक्तीत झाला आहे. म्हणून ही व्यक्तिरेखा प्रभावी वाटते.

**२) बाबासाहेब (वडील) :**

कोकरउड्या आणि रानपालखी या दोन्ही आत्मकथनांमध्ये आलेली लेखकाच्या वडिलांची व्यक्तिरेखा अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

बाबासाहेब म्हणजे लेखकाचे वडील. बापू हे पोलिस खात्यात नोकरी करत होते. त्यांचा स्वभाव हा छंदीफंदी होता. त्यांना वाचनाचा छंद होता. त्यांनी अनेक साहित्यिकांची पुस्तके वाचली होती. बापूंना मटक्याचा नाद होता. त्यांचे शिक्षण फक्त चौथी पास होते. नोकरीच्या निमित्तझने देशात सर्वत्र फिरत होते. बापू हॉकीचे खेळाडू होते. इतिहास, वाङ्मयाचे वाचक व चांगले वक्ते होते. बापूंच्या स्वभावाचे वर्णन करताना डॉ. सुधाकर भोसले म्हणतात, ''लेखकाचे वडील बापू हे अफलातून व्यक्तिमत्त्व आहे. ते कलंदर आणि बिलंदरही.'' (रानपालखी, पृ.२०) डॉ. सुधाकर भोसले यांचे म्हणणे योग्य वाटते. कारण बापूंचा स्वभाव हा छांदसी होता. त्यांना मटका, रेस, दारू यांचा मोठ्या

प्रमाणात छंद होता. नोकरीतला बराचसा पैसा त्यांनी मटक्यात घालवला. त्यांच्या या वागण्याने त्यांच्या पत्नीला व मुलांना खूप त्रास झाला.

लेखक दिवाळीच्या सुट्टीला गावी येतो. त्यावेळी बापू नोकरीतून सुट्टी काढून गावी येतात. त्यावेळी त्यांनी साठवलेला पैसा घेऊन आले होते. येताना त्यांनी आपल्या पत्नीसाठी सोन्याची एकदाणी व गंठण आणला होता. त्यावेळी लेखकाला म्हणतात, ''वसंता, मी साऱ्या कर्जातून निल झालोय. दत्तोबाला तिथूनच टपाल टाकलं होतं. दोन दिवसांपूर्वी तो आला. तेरा हजार रुपये त्याला दिले. व्याजासकट कौसाच्या लग्नात त्यानं केलेल्या खर्चातन मोकळा झालो मी. पोरांनो, अर्धं जन्म काढला तुमच्या आईनं काळ्या पोतीवर.'' (रानपालखी, पृ.२०) बापूंचा स्वभाव जरी छांदिष्टी असला तरी त्यांचा कुटुंबावरती जीव होता. याचाच प्रत्यय वरील प्रसंगावरून येतो.

बापूंनी नोकरीत जेवढा पैसा कमविला तेवढाच त्यांनी गमविला होता. गावी येताना त्यांनी मोठी रक्कम आणली होती. त्या रकमेतून चांगले घर बांधण्याची जबाबदारी त्यांनी आपल्या मुलांकडे सोपविली होती. आपला मुलगा चांगला लेखक आहे, याचे त्यांना कौतुक होते. त्याला नेहमी ते साहित्याविषयी विचारीत. सुट्टीवरती आले की ते विचारीत, ''वसंता, कथा किती प्रसिद्ध झाल्या आतापर्यंत ?'' (रानपालखी, पृ.२१) बापूंना मुलाच्या लेखनाबद्दल अभिमान वाटत असे. मुलाला नोकरी कशी करावी याबाबत नेहमी सांगत.

नोकरीवरून बापू गावी आले की, लेखकाला सातारला घेऊन जातात. घरात जेवणासाठी पुरेशी भांडी नाहीत हे त्यांच्या लक्षात येते. त्यावेळी ते मुलाला म्हणतात, ''किती दिवस जर्मनच्या ताटल्यात जेवणार ? झकास स्टीलचा सेट आणू. आता प्राध्यापक झाला तुम्ही. छान्सा ड्रेस आणू एखादा. तुझ्या आईला पाताळ आणू.'' (रानपालखी, पृ.२२) बापू कधी कधी संसारात लक्ष घालत. पण त्यांना मटक्याचा नाद असल्याने पैसा खर्च करीत. आपल्या घरी जेवणास स्टीलची ताटे असावीत, आपला मुलगा प्राध्यापक झाला. त्याला चांगली कपडे घ्यावीत असे बापूंना वाटते. म्हणून त्याला सातारला घेऊन जातात.

मुलाला नोकरी लागली हे बापूंना कळताच त्यांनी पत्र पाठवून कळवले. आता वसंताला नोकरी लागली तर त्याला लग्नासाठी मुली पाहायला सुरुवात करा. मी रजेवर आल्यावर लग्न थाटात करू. आपल्या मुलाला चांगली खानदानी घराण्यातील मुलगी मिळावी असे वाटतं. हुंडा पण चांगला मिळावा असे वाटते. पण स्वत:चा मुलगा हुंड्यास नकार देतो. त्यावेळी ते मुलाचे ऐकतात आणि

फाकडे घराण्यातील मुलगी मुलास पत्नी म्हणून आणतात. लेखकाचे लग्न झाले त्याच दिवशी त्याची आई सुनेला कप-बशा धुण्यास सांगते. त्यावेळी बापू स्वतःच्या बायकोवरती रागावतो आणि तिला म्हणतो, ''पूजा होऊ द्या की. का आधीच सुनेला कामाखाली दुमतं करताय ? कवा कळायचं सरकार तुम्हांला.'' (रानपालखी, पृ.६१) तसा बापूंचा स्वभाव मनमोकळा होता. लग्न करून आणलेल्या सुनेला कामाला लावलेले त्यांना आवडत नाही. यातून बापूंचे सुनेवरील प्रेम दिसते. बापू रंगात आले की पत्नीला सरकार म्हणत. पण रागावल्यावर सर्वांची खैर काढत.

स्वतःच्या मुलाच्या लग्नादिवशी बापूंनी मटक्याचा आकडा लावला होता. बापूला त्याच दिवशी मटका लागला होता. त्यावेळी बापू मुलाचे व सुनेचे कौतुक करतात. मुलाच्या कानाजवळ येऊन म्हणतात, आज दोन हजाराचा फायदा झाला. तुमच्या नवरा-बायकोची कृपा. असा बापूंचा स्वभाव. त्यांना रोज मटक्याचा आकडा लावण्याचा छंद होता. ते नेहमी मुलाला सांगत, 'ओपनला दोन लावला.'' त्यांना गणिताची खूप आवड होती.

बापूंना मटक्याचा नाद असल्याने पेन्शनचा सर्व पैसा घालवत. तो संपल्यावर नीरेला मुलाकडे जाऊन घरचे काहीतरी कारण सांगत व मुलाकडून पैसा उकळत. स्वतः घराचे काम करतो, असे मुलांना सांगत. पण मिळालेला पैसा स्वतःच्या चैनीसाठी वापरत. तो संपला की ते परत कोडगेपणाने मुलाकडे जात. यातून बापूच्या स्वार्थी स्वभावाचे दर्शन घडते. बापू एखाद्याला टोपी घालण्यात पटाईत. स्वतःच्या मुलांनासुद्धा त्यांनी जमिनीच्या व्यवहारात फसवले होते. मुलांच्या आजारपणाचे नाटक रगवून ते मुलांच्या मित्रांकडून पैसे मिळवत. पेन्शन संपेपर्यंत ते फिरायचे. पेन्शन संपली की मुलाकडून पैसे मिळवण्याचा प्रयत्न करीत.

स्वतः बापूंनी मुलांच्या भांडणात मुलांवरती फौजदारी करतो असे म्हणत. त्यामुळे लेखकाच्या आईला खूप त्रास सहन करावा लागला. बापूंना मटका पेपरवाचन, बिडी व संध्याकाळी दहा मिली येवढाच त्यांचा त्रास असायचा. तसा त्यांचा स्वभाव काटक होता. पण त्यांना शेवटी व्याधीने पछाडले. त्यांना मुलांनी दवाखान्यात नेले. त्यावेळी सुद्धा ते मुलाला क्रिकेटचा स्कोअर किती झाला ते विचारतात. एवढा हा रसिकवृत्तीचा माणूस होता. त्यांचा स्वभाव छंदीफंदी असला तरी लेखकाच्या वाङ्मयीन जडणघडणीत बापूंचा वाटा होता. ते लेखकाला पहिल्यापासून वाचण्यास मासिके आणत व साहित्याविषयी ते गप्पा करीत.

एकूण बापू या व्यक्तीचा विचार करता एक साहित्यप्रेमी, हॉकीचा खेळाडू, एक वक्ता, अनेक ठिकाणी नोकरी निमित्त फिरणारे. या जमेच्या बाजू वगळता स्वभावाने छांदशी, मटक्यावरती पैसे उधळणारे, पैशासाठी खोटे बोलणारे. अशाप्रकारचे बहुरंगी व्यक्तिमत्त्व असणारी व्यक्ती म्हणजे बापू होय.

३) आई (हौसाबाई) :

'रानपालखी' या आत्मकथनातील हौसाबाई (आई) ही महत्त्वाची व्यक्तिरेखा आहे. हौसाबाई ही लेखकाची आई आहे. बोधे यांच्या जडणघडणीत तिचा महत्त्वाचा वाटा आहे. हौसाबाईचा बाबासाहेब यांच्याशी विवाह झाला आणि ती दुधी या गावी नांदू लागली. तिच्या नवऱ्याचा स्वभाव छंदीफंदी होता. त्यामुळे तिचे सासू-सासरे, दीर तिला खूप त्रास देतात. नवरा पोलिस खान्यात नोकरीला होता. त्यामुळे त्याला गावापासून दूर रहावे लागे. त्यातच त्यांना मटक्याचा व बाईचा नाद होता. त्यामुळे त्यांचे संसारावरती व मुलांवरती लक्ष नसायचे. कधी-कधी त्यांची मनिऑर्डर यायची. पण सासू-सासरे घेत. हौसाबाईला देत नसत. त्यामुळे हौसाबाईला भरपूर कष्ट करावे लागत. नवऱ्याच्या स्वभावामुळे तिचे हाल व्हायचे. पण ती स्वत: कष्टाळू व जिद्दी होती. तिने रानात कष्ट करून रोजगार करून लोकांची घरे सारवून प्रसंगी उपाशीपोटी राहून मुलांना शिकविले. यातून तिची जिद्द दिसून येते.

नवऱ्याच्या विचित्र स्वभावामुळे संसाराची सर्व जबाबदारी हौसाबाई वरती येते. तरी ती घाबरत नाही. मुलांच्या शिक्षणासाठी स्वत:च्या जमिनीत कष्ट करते. जमीन पिकावी, तिला खत माती मिळावी, मुलांना दूधदुभते मिळावे म्हणून शेळ्या पाळते. पण मुलांना शिकविते. हौसाबाई दिवस-दिवस रानात काम करते. घरी दारिद्रय असले तरी तिने कुणापुढे स्वाभिमान गहाण ठेवला नाही. कुणापुढे कधी दु:खाचा डिंडोरा पिटला नाही.

डॉ. यशवंत पाटणे हौसाबाईबद्दल म्हणतात, ''खेड्यापाड्यांत काबाडकष्ट करण्यात ज्यांचं जीवन गेलं. दारिद्र्यातही ज्यांनी आपली जिद्द आणि स्वाभिमान सोडला नाही. फाटका गळका संसार सांभाळताना लेकरांच्या शिक्षणाची काळजी घेतली आणि बापाच्या माघारी पोरांच्या मनावर सामर्थ्याचा घट्ट संस्कार केला. अशा वत्सल आईचं न्यारं रूप बोधे चितारतात.''[१] डॉ. पाटणे यांचे हे विधान सार्थ वाटते. हौसाबाई ही एक कष्टाळू व स्वाभिमानी गावपांढरीत राबणारी दारिद्र्यातही जिद्दीने आपला फाटका गळका संसार सांभाळणारी आहे. नवऱ्याच्या माघारी मुलांवरती चांगले संस्कार करून त्यांना चांगले शिक्षण दिले. त्यांना माया दिली. यावरून तिच्या स्वाभिमानी स्वभावाचे दर्शन इथे घडते.

बोधे यांच्यावरती हौसाचा विशेष जीव होता. ज्यावेळी सोमेश्वरवरून घरी येतो, त्यावेळी ती त्याची नेहमी वाट बघत बसायची. लेखक आल्याबरोबर ती त्याच्या गालावरून हात फिरवते. त्याचा मुका घेते आणि त्याला म्हणते, ''कसा आलास बाबा, बर झालं. हे पाणी तापलंया बघ. पैल हातपाय धून घे. तरी माझी पापणी कालपासून फरारतिया.'' (रानपालखी, पृ. ११, १२) येवढी हौसा मुलाच्या येण्याने आनंदित होते. तिला आपला मुलगा भेटाय येणार याची जाणीव होती. इतका तिचा मुलावरती जीव आहे. या वरील प्रसंगातून हौसाबाईचे मुलावरील प्रेम दिसून येते.

हौसाबाईच्या घरी दारिद्रय असल्याने आणि मुलाच्या शिक्षणाचा खर्च यांमुळे घरात लाईट घ्यायला पैसे नसतात. त्यामुळे ती दिव्याच्या उजेडावरती त्या घरात राहत होती. मुलगा घरी आला. त्यावेळी दिव्यातील रॉकेल संपते. त्यावेळी हौसाबाई म्हणते, ''साऱ्या गावात लाईट आली पण आपल्या घरात न्हाय.'' (रानपालखी, पृ. १२) हौसाबाईला याचे फार वाईट वाटते. आपला मुलगा नोकरीला लागला. त्याने आता घरात लाईट घ्यावी असे तिला वाटते. म्हणून ती मुलाला सांगते.

हौसाबाईचा नवरा जरी संसारात लक्ष देत नव्हता. तरी हौसा त्याचा तिरस्कार करीत नाही. मुलगा सुट्टीला घरी आल्यावरती ती लगेच त्याला, ''बापाचे टपाल आलयं बघ त्या पीटीत आसंल, त्याला नोकरी लागल्याचं कळीव तेवढं. आर कसाबी असला तरी बाप हाये त्यो.'' (रानपालखी, पृ.१२) या विधानातून हौसाईची नवऱ्यावरील श्रद्धा दिसून येते. हौसाबाई ही पतिनिष्ठ आहे. ती आपल्या मुलांना नवऱ्याबद्दल चांगले सांगते. यावरून हौसाबाईची पतिनिष्ठा दिसून येते.

हौसाबाईला नेहमी कष्ट उपसावे लागत. तिला रानातील कामाचा व शेळ्यांचा त्रास होतो. रानातील कष्टाने तिचे शरीर खंगते. त्यावेळी लेखक आईला म्हणतो, ''ह्यो रोग टाक इकून पातीव बसून भांगलणार का शेरड राखणार ? '' (रानपालखी, पृ. १२) यावरती हौसाबाई मुलाला म्हणते, ''आतापवतर कोण सरगातन माझा बाप यीवून करत हुता व्हय ? आरं शेरडं हायती म्हणून रानामाळाला खात मिळतंया, च्याला दुधाचा टाक मिळतुया. येक रांड गावात यैक म्हणत न्हाय. घरच हाय म्हणून दिसत न्हाय.'' (रानपालखी, पृ.१३) वरील विधानातून हौसाची काम करण्याची जिद्द दिसते. हौसाबाई ही व्यवहारी आहे. आपल्या शेतीला खात-माती मिळावी यासाठी ती शेळ्या सांभाळते. घरात दूध मिळावे म्हणून ती शेळ्या विकत नाही. हौसाबाई तशी स्वावलंबी होती. आपल्या शेतीत सर्व भाजीपाला पिकविते. म्हणूनच हौसाबाईला आपला संसार सांभाळता येतो.

हौसाबाईला मुलगा खर्चासाठी पैसे पाठवितो. पण ते स्वीकारण्यास हौसाबाई नकार देते. मुलाला समजावून सांगताना म्हणते, "काय नक पाठवायला. तुझा तू चांगला रहा मजी झालं. मला काय लागतंय ? सगळं हाय हिथं. भाजी हाय ... कुथमीर हाय... मिरच्या हायत्या... दूध घरच हाय... जळन काटूक हाय ..... शेरच्या वस्तीला सगळ इकात घ्यावं लागतं." (रानपालखी, पृ.१३) वरील विधानातून हौसाबाईच्या मनाचा मोठेपणा दिसतो. स्वत: सर्व भाजीपाला पिकवते. घरात लागणाऱ्या वस्तूंची तरतूद करते. पण मुलांना पैशासाठी कधी मागणी करीत नाही. त्यांनाच पैसे देते. मुलाला म्हणते शहरात सर्व विकत घ्यावे लागते. त्यासाठी बोकड विकलेले पैसे देते. हौसाचा स्वभाव मनमोकळा होता. तिने कधी स्वत:ची हौस केली नाही. लेखकाच्या कथा पुण्याची व्यक्ती प्रसिद्ध करणार आहे हे कळताच तिला आनंद होतो. त्यावेळी मुलाच्या कथांनी भरलेली पेटी त्याला देते. स्वत: दिवा लावून त्याला शांतपणे शोधण्यास सांगते. मुलांच्या सर्व कागदांची ती दक्षता घेते. मुलांना म्हणते, "माणसानं सगळी कागदं जपून ठेवावी. कवा काय लागल सांगता येतंय का ?" (रानपालखी, पृ.१४) हौसाला जरी शिक्षण मिळाले नसले तरी तिला व्यवहारज्ञान चांगले होते.

हौसाबाईला दागदागिन्यांचा हव्यास कधीच नव्हता. तिने मुलांसाठी काबाडकष्ट केले. लग्न झाल्यापासून तिने काळ्यापोतीवरती उभे आयुष्य काढले. पण कधी नवऱ्याला दागिन्याची मागणी केली नाही. परंतु नवऱ्याने नोकरीतून पैसा साठवून हौसाबाईला सोन्याचे गंठन व अंड कृती मण्यांची एकदाणी आणली. त्यावेळी हौसाला मोठा आनंद होतो. कारण नवऱ्याने आणलेला दागिना हा पहिल्यांदाच आणला होता. त्यावेळी स्वत:च्या मुलाला ती गळ्यातील दागिना हाताने खुणावून दाखवते. आणि म्हणते, "लाय गटूळ आणलय बापानं तुझ्या." (रानपालखी, पृ.२०) नवऱ्याने आणलेली मोठी रक्कम पाहून हौसा आनंदाने मुलाला सांगते.

बाबासाहेब सातारला जाताना हौसाला विचारतात, "सरकार तुमच्यासाठी काय आणू ?" (रानपालखी, पृ.२०) यावरती हौसा म्हणते, घरात शेवगा नाही. घरात सणावाराला कुरवड्या करण्यासाठी सगळ्या आळीत फिरावे लागते. मुलांच्यासाठी सणावाराला चार घास मिळावेत असे हौसाला वाटायचे. तिने स्वत:साठी कधी काही मागितले नाही. यातून तिची संसाराची जबाबदारी दिसते.

हौसाचा स्वभाव हा तटस्थ होता. घराचे दार बसवण्यासाठी मुलाने गावातील गुरवाच्या पोराला दारू दिली. त्यावेळी हौसाबाई त्याच्यावरती रागवते. तिला कामात आळशीपणा केलेला कधीही सहन होत नसे. ती स्वत: त्यावेळी स्वत:च्या मुलावरती जाळ काढते. हौसा प्रसंगी कठोर

वागते. स्वत:हून ती कुणाशी भांडत नसत. मुले तिच्यापासून दूर रहात होती. त्यामुळे भावकीतील लोक तिला त्रास देण्याचा प्रयत्न करीत. पण हौसा स्वत: त्यांना चांगला धडा शिकवीत. हौसाबाईचे घरावरती, शेतीवरती चांगली नजर असायची. स्वत: कुणास काही त्रास देत नव्हती. पण तिला त्रास दिल्यानंतर ती मोठ्याने भांडत होती.

मुलगा लग्न झाल्यावरती प्रत्येक शनिवार-रविवार घरी येतो. त्यावेळी हौसाबाईला मुलाची होणारी धावपळ बघवत नाही. ती मुलाला पत्नीला सोबत नेण्यास सांगते. हौसाला मुलाच्या मनातील भावना समजते. हौसाबाईचा स्वभाव तसा समजूतदार होता. आपल्या मुलीला सासरची माणसे त्रास देतात. ते पाहून तिला फार वाईट वाटते. ती मुलापाशी रडते. यातून हौसाचे मुलीवरील प्रेम दिसते. तिचा मुलांसाठी नेहमी जीव तुटतो.

लेखकाच्या 'जंगल' कादंबरीने गावातील सर्वजण लेखकाच्या विरोधात जातात. वातावरण तंग होते. त्यावेळी हौसाबाई लेखकावरती रागावते. त्याला म्हणते, "तुला काय धेडग्यांनी वकिली दिलीया ? रांडा जिथं भेटलं तिथं वाटत पाण-उतारा करत्यात्या. ही टपाल आलय बघ बापाचं. याक कीरडीवाला टपाल लिहायला तयार न्हाय. आळीसुदीक फितरवली त्यांनी." (रानपालखी, पृ.८८) आपल्या मुलांना कुणीही बोललेले हौसाबाईला खपत नाही. लेखकाने दलितांच्या अन्यायाला वाचा फोडावी म्हणून कादंबरी लिहिली. त्यामुळे हौसाच्या घरावरती दगडफेक केली जाते. त्यामुळे ती रागाने म्हणते, "आरं दहा शिवारात रोजगार केला पण कुणाचं फट म्हणून घेतलं न्हाय."(रानपालखी, पृ.८८) हौसाबाईने अनेक ठिकाणी पोटासाठी रोजगार केला. त्यासाठी अनेक शिवार ती फिरली होती. ती कुणाच्या चार पैशाला ती मिंदी नसायची. यावरून हौसाबाईचा सरळमार्गी स्वभाव दिसतो.

बापूंच्या वागण्याचा हौसाला खूप त्रास होतं असे. त्यावेळी ती नेहमी मुलांची बाजू घेते. एकदा लेखकाचे बापूंशी कुरबूर होते. तेव्हा लेखक रागाने निघतो. त्यावेळी हौसा त्याच्या गाडीमागे धावते. यातून तिचे मुलांवरील प्रेम दिसते. हौसाबाईला कष्ट होत नाही. त्यावेळी मुले रोजगारी लावत. पण तिला वाटायचे मुलांनी त्यांच्या सोबत रानात जावे. त्यांच्या जिवावर काम सोडू नये. कारण ती स्वत: रानात राबत होती.

हौसाच्या मुलाने गावातील हनुमान मंदिराचा जीर्णोद्धार करायचा निर्णय घेतला ही बातमी कळताच हौसाला आनंद होतो. ती त्याला आनंदाने पाडव्याच्या दिवशी जेवण वाढते. आपल्या मुलांनी गावाच्या उचापतीत पडू नये असे तिला वाटते. सणवार आनंदाने खावा यासाठी तिचा नेहमी जीव तुटत असे.

हौसाला आपल्या मुलांनी जत्रेयात्रेला आनंदाने एकत्र येऊन खावे. यात्रेचा आनंद घ्यावा असे तिला वाटते. परंतु मुलांना गावासाठी काहीतरी करावे असे वाटते. हौसा एकदा संतापाने मुलाला म्हणते, ''न्हव येवढ दोन किलो मटाण कशाला माझ्या मड्यावर घालाय आणलयं व्हय? सकाळ धरनं टुकडा खाल्ला न्हायस. जळली तिकडं जत्रा जेव.'' (रानपालखी, पृ.१६५) मुलांनी मन लावून खावं प्यावं असे हौसाला वाटते. त्यासाठी ती रागावते पण तिचा राग हा थोड्यावेळापुरता असतो.

नवऱ्याची प्रकृती खालावते त्यावेळी स्वतः त्यांची देखभाल करण्यास दवाखान्यात जाते. पण मुले तिला घरी पाठवतात. नवऱ्याचा मृत्यू होतो. त्यावेळी हौसाला वाईट वाटते. परंतु मुलांच्या तोंडाकडे पाहून ते दुःख गिळते. नवऱ्याच्या मृत्यूने हौसा खंगते. रानात कष्टाने झिजलेले शरीर अधिक खंगते. तरी सुद्धा स्वतःच्या चिवटपणाने मुलाबाळांत थोडेफार दिवस कंठते. पण शेवटी तिलाही आजाराने घेरले. हौसा काही दिवस गावी राहते. पण आजार वाढल्याने प्रकाश तिला रहिमतपूरला नेतो. प्रकृती मात्र खालावते आणि अखेरची घटका जवळ येते. त्यावेळी हौसा प्रकाशला म्हणते, ''गावाकडे जात जा. घरात दिवा लावत जा. मांजर वेलंगला सोडून दे. कुलूप नीट लावत जा. देव्हाऱ्यातील देव आणा. बापूंच्या टाकाची पूजा करा. मंगळवार गाठून चौडाई देवीला नेवध दाखवत चला. घरावर लक्ष ठेवा. दगडधोंडा सांभाळा.'' (रानपालखी, पृ.२७३) हौसाला मरणाची जाणीव झाली असावी. त्यावेळी ती मोठ्या मुलाला शेवटचे बोलते. तिला आपली हाडके गावपंढरीत पडावीत असे वाटत होते. शेवटी तसेच होते. हौसा शेवटची घटका मोजत असताना तिचा रक्ताचा सर्व गोतावळा तिच्या भोवती होता. नव्हता फक्त तिचा धाकटा लेक उत्तम. याचे तिला दुःख होते. अखेर हौसाने पहाटे चार वावजून दहा मिनिटांनी प्राण सोडला. तेव्हापासून लेखक त्याच्या गावचा पाहुणा होतो.

हौसाच्या एकूण स्वभावाचे वर्णन करता हौसा ही कष्टाळू, स्वाभिमानी, जिद्दी, संस्कारी, पतिव्रता, शेती, मुलाबाळांवर प्रेम करणारी धार्मिक वृत्ती असणारी स्त्री आहे. याची सहज जाणीव होते. लेखकाच्या जडणघडणीत हौसाबाईचा महत्त्वाचा वाटा आहे.

### ४.३ गौण व्यक्तिरेखा :

'रानपालखी' या आत्मकथनातील हौसा, बापू आणि या आत्मकथनाच नायक वसंता यांच्या मध्यवर्ती व्यक्तिरेखा जेवढ्या महत्त्वाच्या आहेत, तेवढ्याच या आत्मकथनातील इतर गौण व्यक्तिरेखाही महत्त्वाच्या आहेत. या व्यक्तिरेखांशिवाय रानपालखीच्या आशयबांधणीला परिपूर्णता लाभत नाही. त्यामध्ये प्रामुख्याने प्रकाश, उत्तम, कौसा यांच्या व्यक्तिरेखा ठळकपणे लक्षात राहतात.

**१. प्रकाश :**

प्रकाश बाबासाहेब बोधे यांचा मोठा मुलगा आहे. लेखक प्रकाशपेक्षा लहान आहे. लेखकाला नोकरी लावण्यामध्ये प्रकाशची महत्त्वाची भूमिका आहे. लेखकाला सोमेश्वर या ठिकाणी नोकरी लावण्यासाठी प्रकाशने स्वत: अर्ज केला होता. त्यामुळेच लेखकाला नोकरी मिळते. प्रकाश प्रत्येक वेळी वसंताला मार्गदर्शन करीत असे. लेखक स्वत: प्रकाशचे मार्गदर्शन घेत. प्रकाशला लेखकाचे कार्यक्रम ठेवण्यात आनंद असायचा. तो नेहमीच निरपेक्ष हेतूने धडपडणारा, साहित्याचा जाणता रसिक व व्यवहारकुशल आहे.

प्रकाश लेखकापेक्षा मोठा असूनही तो कधी मोठेपणाचा टेंभा मिरवत नाही. घराचे काम करताना स्वत: जड कामे करी. घरावरती पाणी मारत. या सर्व प्रसंगांतून त्याचे भावावरील प्रेम दिसून येते. यात्रेच्या तमाशात लेखकाला मारण्यासाठी इतर मुले येणार आहेत हे प्रकाशला लक्षात आल्यानंतर स्वत: पुढे जाऊन म्हणतो, "कुंचा मादरचोद दगड मारतोय दाखव मला. थोबाडतोच यकायकाला." (रानपालखी, पृ. १६५) प्रकाशला आपल्या भावाला कोणी काही म्हटलेले खपत नसे. तो लगेच त्यांना धडा शिकवतो.

प्रकाश नेहमी गावातील कार्यक्रमात लेखकाला मदत करीत. वाचनालयाच्या व मंदिराच्या उद्‌घाटनासाठी स्वत: पाहुण्यांना आणण्यासाठी पुण्यास जात. प्रकाश व त्यांच्या वडिलांचे पटत नसे. परंतु वडील आजारी होते त्यावेळी त्यांची सर्व स्वच्छता स्वत: करीत. यातूनच त्याचे भाऊ आणि वडिलांवरील प्रेम दिसते. तो नेहमीच वसंताची चौकशी करीत असे. स्वभावाने शांत तितकाच रागीट वृत्तीचा होता.

**२. उत्तम :**

उत्तम हा लेखकाचा लहान भाऊ. त्याचा व लेखकाचा फारसा संबंध येत नसे. तो नोकरीसाठी बाहेरगावी राहत. लेखकास घरकामात उत्तम विशेष मदत करी. बापूंच्या आजारपणात त्याने प्रकाशबरोबर वडिलांची सेवा केली. तो फारसा गावी येत नसे. स्वभावाने शांत, बुद्धीने हुशार अशी ही व्यक्तिरेखा आहे.

**३. नीता :**

नीता ही 'रानपालखी' या आत्मकथनाचा नायक वसंता याची पत्नी. स्वभावाने शांत व मनाने मोकळी असा तिचा स्वभाव आहे. नीता ही संस्कारशील घराण्यात वाढलेली आहे. तिचे

स्वत:च्या कुटुंबावरती व पतीवरती नितांत प्रेम आहे. नीताचा विवाह झाला तेव्हापासून घरकामात पडेल ते काम मन लावून करी.

नीता लग्नानंतर काही दिवस दुधीत होती. तिचा नवरा सोमेश्वरला होता. परंतु स्वत: तिने त्यांच्यासोबत राहण्याचा विचार केला नाही. घरात सासू-सासरा, दीर, नणंद या सर्वांची दखल नीता घेते. नीताला सोमेश्वरला नेल्यानंतर खूप काम करावे लागे. तिला पहिले मूल होते. त्यावेळी खूप त्रास होतो. त्यातच नीता प्रकृतीने नाजूक होती. दुसऱ्या मुलाच्या वेळी तिला दवाखान्यात जावे लागते. खूप त्रास सोसावा लागला. त्यावेळी तिला दोन मुलांची देखभाल करावी लागते. परंतु या सर्वांना ती सामोरे जाते.

नीताच्या नवऱ्याला नेहमी कामानिमित्त गावी जावे लागते. त्यावेळी स्वत: ती घरची काळजी घेते. नीताच्या लग्नात घातलेले दागिने तिच्या सासऱ्याने मागताच नीता काढूनदेते. त्यांना विरोध करीत नाही.

आपल्या नवऱ्याने गावातील मंदिराच्या जीर्णोद्धाराचे कार्य हाती घेतले हे कळताच तिला आनंद होतो. त्यावेळी स्वत: नवऱ्याला मदत करते. घरात येणाऱ्या पाहुण्यांची नीता चांगली सोय करीत. त्यांचा पाहुणचार करताना कुठेसुद्धा ती कमी पडत नाही.

रानपालखीतील या सर्व घटना प्रसंगावरून नीताच्या स्वभावातील जिद्द, नि:स्वार्थीपणा, कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडण्याची तिची मानसिकता, काटकसरीने संसार करण्याची वृत्ती, इतरांच्या सुखदु:खात सहभागी होण्याची प्रवृत्ती, अशा अनेक स्वभाव विशेषांवर प्रकाश पडते.

**४) प्राचार्य घुनकीकर :**

रानपालखीचा नायक वसंतराव यांच्यातील सजग लेखक सतत जागृत ठेवण्यामध्ये त्यांनी लिहिलेल्या कवितांचा आस्वाद घेऊन एक मार्गदर्शकाची भूमिका पार पाडणाऱ्या व्यक्तिमध्ये प्राचार्य घुनकीकर यांची भूमिका महत्त्वाची आहे.

जे. टी. घुनकीकर हे सोमेश्वर नगरच्या मु. सा. काकडे या महाविद्यालयात प्राचार्य म्हणून काम पहात. ते स्वभावाने चांगले. त्यांचा लेखकावरती जीव असे. ते इंग्रजी विषयाचे प्राध्यापक असूनही त्यांचे मराठीवरतीही तितकेच प्रभुत्व होते. स्वभावाने गंभीर पण चौफेर अभ्यासू होते. ते स्वत: कविता करत. लेखकाला ना. धों. महानोरांच्या कविता म्हणायला लावीत. लेखकाच्या कथा स्वत: आवडीने वाचत. त्यांना लेखकाचा अभिमान होता. त्यांनी लेखकाला सांस्कृतिक मंडळाचे प्रमुख केले होते.

घुनकीकर सर लेखकाला लेखनासाठी टेबल खुर्चीची व झोपण्यासाठी कॉटची सोय करतात. लेखकाशी नेहमी साहित्यावरती चर्चा करीत. त्यांना खेळाचे विशेष वेड होते. ते स्वत: सर्व प्राध्यापकांसोबत प्रत्येक पौर्णिमेला एकत्र चांदण्यात जेवणाचा बेत करत. लेखकावरती त्यांचा जीव होता. स्वत:साठी त्यांनी कधी संस्थेच्या गाडीचा उपयोग करत नसतं. ते गोरगरीब मुलांसाठी ग्रंथालयात व बागेत नोकरी लावत. स्वत: त्यांच्या खाण्याची व राहण्याची दक्षता घेत लेखकाच्या लेखनाला घुनकीकर विशेष दाद देत. त्यांना प्रेरणा देत यातून त्यांचे साहित्यावरील प्रेम दिसून येते. लेखकाला त्यांच्या मार्गदर्शनाचा पुढे चांगला फायदा होतो.

**५. पंडित :**

पंडित हा कॉमर्सचा प्राध्यापक. लेखकाचा स्टाफ मेंबर होय. तो गणपतीची मूर्ती बनवत. त्याची चित्रकला चांगली होती. पंडित लेखकाला प्रत्येक कार्यात मदत करीत. त्यालाही साहित्याची आवड होती. लेखकाच्या 'पुंगी' नावाच्या हस्तलिखिताचा प्रत्येक अंक पंडित सजवित. लेखकासोबत पंडीत वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा यांच्यात तो मदत करीत.

## ४.४ समारोप :

'रानपालखी' या आत्मकथनात अनेक पात्रे येतात. परंतु काही पात्रे ही एखाद्या दुसऱ्या प्रसंगात लेखकाशी संबंध येतो त्यांचा परिचय करता येईल. परंतु प्रबंधिकेची मर्यादा लक्षात घेता उल्लेखनीय व महत्त्वाच्या व्यक्तिरेखांचा परिचय करून देण्याचा प्रयत्न प्रस्तुत प्रकरणात केला आहे.

## ४.५ निष्कर्ष :

१) 'रानपालखी' या आत्मकथनातून व. बा. बोधे यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू समोर येतात.

२) आत्मकथनाचा नायक म्हणून व. बा. बोधे यांची व्यक्तिरेखा मध्यवर्ती असली तरी रानपालखीतील हौसाबाईच्या व्यक्तिरेखेभोवती कथानक फिरताना दिसते.

३) 'रानपालखी'तून व. बा. बोधे यांची सामाजिक बांधीलकी दिसून येते.

४) 'रानपालखी'ची भाषा ही नागर व ग्रामीण अशा संमिश्र स्वरूपात पहावयास मिळते.

५) 'रानपालखी'तून ग्रामीण जीवनाचे वास्तव दर्शन घडते.

६) 'रानपालखी' या आत्मकथनातून लेखकाचे दलित उपेक्षित समाजाविषयी असलेली आत्मीयता दिसून येते.

## ४.६ संदर्भ टिपा :


१. पाटणे यशवंत : 'रानपालखी' भावरम्य शैलीत साकारलेली अक्षरयात्रा, शोधनिबंध, दै. पुढारी, ३१ ऑगस्ट २००३, पृ. ५ (सातारा) एक परिसंवाद.

२. डॉ. भोसले सुधाकर : 'रानपालखी' नव्हे रानफळ, दै. पुढारी, ३१ ऑगस्ट २००३, पृ. ५ (सातारा) एक परिसंवाद.


-----x-----